समाचार
SAMACHAR

दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा...

Volume - 75 | Issue- 70 | Marathi Daily | Saturday 07/10/2026 | Pages - 4+4 | Price- Rs. 3

HAPPY DIWALI

शुभेच्छूक

कांतीलाल चंदुलालजी कोठारी
आनंद कांतीलालजी कोठारी
हर्ष कोठारी प्रेम कोठारी
अमोल ताथेड
एवं समस्त कोठारी परिवार
जामखेड व अहिल्यानगर

यंदाची सुवर्णखरेदी दिवाळी धमाका ऑफर भरघोस फायद्याची..

₹ 999/*- प्रतीग्रॅम मजुरी (22 कॅरेट सर्व दागिन्यांची) + ₹ 111/*- चांदी चक्क फ्री (प्रतीग्रॅम सोने खरेदीवर)



सोनेखरेदीवर लकी ड्रॉ कुपनव्दारे 11 एलईडी टिव्ही (43") जिंकण्याची सुसंधी*
(प्रती एक ग्रॅम एक लकी कुपन.)

ऑफर कालावधी – 11 ऑक्टोबर 2026 ते 30 डिसेंबर 2026 पर्यंत वैध

शुध्दतेनुसार सोन्याचा दर 22 कॅरेट = (91.6 शुध्दता) | शुध्दतेनुसार चांदीचा दर

चंदुकाका ज्वेल्स™
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02



2014 पासुन आपल्या सेवेत.. सोनेरी नातं..

Conditions Apply*

विशेष संपादकीय

दिवाळी प्रत्येकासाठी



ज्ञानेश कुलकर्णी

दिवाळीमध्ये लक्ष्मीच्या स्वागतासाठी घर सजते. तिजोरीतील धनाची पूजा होते आणि वर्षभर सुखसमृद्धी नांदावी, अशी प्रार्थना केली जाते. बलिप्रतिपदेच्या निमित्ताने पाडव्याचा आनंद साजरा होतो. भेटवस्तू, औक्षण आणि पतीपत्नीच्या प्रेमाच्या अभिव्यक्तीतून नात्यांना नवा उजाळा मिळतो. दोन्ही दिवसांच्या या परंपरा सुंदर आहेत. मात्र हे सण म्हणजे केवळ परंपरा नव्हेत, तर त्यामागे एक समृद्ध जीवनदृष्टी आहे. लक्ष्मीपूजन म्हणजे केवळ धनाची पूजा नव्हे, तर धनाच्या निर्मितीमागील श्रमांचा सन्मान आणि त्याच्या विनियोगातील विवेकाचा स्वीकार आहे. ज्या घरात अन्नाचा आदर, स्त्रीचा सन्मान, नात्यात विश्वास, व्यवहारात प्रामाणिकपणा आणि मनात समाधान नांदते, तिथेच लक्ष्मीचा खरा वास असतो. लक्ष्मी म्हटले की धन, सुवर्ण, वैभव आणि ऐश्वर्य यांचे चित्र आपल्या मनात उभे राहते. मात्र भारतीय संस्कृतीत लक्ष्मीची संकल्पना अधिक व्यापक आहे. धनलक्ष्मीबरोबर धान्यलक्ष्मी, धैर्यलक्ष्मी, विद्यालक्ष्मी, आरोग्यलक्ष्मी, (पान २ वर)

पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांची माहिती

८ लाख शेतकऱ्यांच्या बँक खात्यात ४०३ कोटी रूपये जमा

समाचार/नगर-दि.७



जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थिती आणि शेतकऱ्यांसमोरील आर्थिक संकटाच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महायुती सरकारने दिलेल्या आश्वासनाची पूर्तता केली असून नुकसानीपोटी अग्रीम मदत जिल्ह्यातील सुमारे ८ लाख ७ हजार २८४ शेतकऱ्यांच्या बँक खात्यांमध्ये प्रत्येकी पाच हजार रुपयांची मदत जमा झाली आहे. या माध्यमातून सुमारे ४०३ कोटी ६४ लाख रुपये शेतकऱ्यांच्या खात्यात वर्ग झाले असल्याची माहिती पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली.

जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीचा सातत्याने आढावा घेत शेतकऱ्यांना तातडीने मदत मिळावी यासाठी शासनस्तरावर केलेल्या पाठपुराव्याच्या पार्श्वभूमीवर या मदत वितरणाला महत्त्व प्राप्त झाले आहे. जिल्ह्यातील विविध तालुक्यांमध्ये पावसाने दिलेली ओढ, पिकांची झालेली हानी, घटलेले उत्पादन आणि वाढता शेतीचा खर्च यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडले होते. राज्य सरकारने नूकसानीपोटी शेतकऱ्यांना पाच हजार रुपयांची अग्रीम मदत दिवाळीपुर्वी देण्याची घोषणा केली होती. दुष्काळाची गंभीरता लक्षात घेऊन पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात टंचाई आढावा बैठका घेवून प्रत्येक तालुक्यातील परिस्थितीचा अहवाल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना अहवाल यांना सादर केला होता. प्रशासनाला आवश्यक उपाय योजनांसाठी सूचना दिल्या होत्या. राज्य सरकारने शेतकऱ्यांना जाहीर केलेल्या मदतीसाठी पहिल्या ट्रीगर मध्ये (पान ३ वर)

उठाठेव

– विवेक मेहेत्रे





Trident
2 & 3 BHK Apartments

This Diwali, Own your Dream Home
with Exclusive Festive Benefits.

Special Diwali Offer
Easy Payment Plan*
1% Booking Payment Only | 10% Payment Every 2 Months

Get 3 Complimentary Home Appliances*



साईट : पम्पिंग स्टेशन रोड, एल अॅण्ड टी गेस्ट हाऊस शेजारी, सावेडी, अहिल्यानगर.

Diwali offer valid till 20th November 2026

*Offer valid only for the Rainflower and Trident projects.
Home Appliances will be given after possession of the flat.

MARC CONSTRUCTION

बुकींगसाठी संपर्क
9850894148, 9552555621

RERA REGISTRATION NO. P52200077919

GALAXY

(पान १ वरुन)

दिवाळी प्रत्येकासाठी

विजयलक्ष्मी, गृहलक्ष्मी ही तिची विविध रूपे आहेत. घरात अन्नधान्याची रेलचेल, निरोगी शरीर, ज्ञानामुळे समृद्ध झालेले ठाम, स्पष्ट आणि कल्याणमय विचार, संकटांना सामोरे जाण्याचे धैर्य, मनात असलेले समाधान आणि कुटुंबात असलेले प्रेमाचे वातावरण हीदेखील लक्ष्मीचीच रूपे आहेत. पैसा माणसाला अनेक सुविधा देतो. पण सुखाची हमी देत नाही. मोठे घर, महागड्या वस्तू आणि भरलेली तिजोरी यांच्याबरोबरच घरात मोकळेपणा, जिव्हाळा आणि परस्परांचा विश्वास असणेही आवश्यक आहे. संपत्ती वाढत असताना मनाची श्रीमंती कमी होत असेल, नात्यांमध्ये दुरावा वाढत असेल आणि समाधान हरवत असेल तर ते वैभव अपूर्णच राहते. खरी समृद्धी संपत्तीमुळे जीवनात निर्माण होणाऱ्या सुंदरपणात, सुरक्षिततेत आणि आनंदात आहे. म्हणूनच लक्ष्मीपूजनाच्या दिवशी धनाबरोबर आरोग्य, ज्ञान, समाधान आणि नात्यातील जिव्हाळा आणि प्रेम या जाणीवांचीही पूजा व्हायला हवी. लक्ष्मीपूजनाच्या दिवशी नाणी, दागिने, हिशेबाच्या वह्या आणि व्यवसायातील साधनांची पूजा करण्याची परंपरा आहे. पूजेच्या वेळी धनाला पवित्र मानताना ते मिळवण्याच्या मार्गातील नैतिकताही जपली गेली पाहिजे याची जाणीव मनात रुजायला हवी. संपत्तीचे पावित्र्य तिच्या संख्येने नव्हे तर निर्मितीतील प्रामाणिकपणाने आणि वापरातील विवेकाने ठरते. आजच्या सामाजिक आणि आर्थिक परिस्थितीमध्ये या विचाराला विशेष महत्त्व आहे. आज सामाजिक परिस्थिती सामान्यजनांसाठी अनुकूल नाही. महागाईने सामान्य कुटुंबांचे आर्थिक गणित विस्कटले आहे. जीवनावश्यक वस्तूंच्या वाढत्या किमती, शिक्षण आणि आरोग्यावरील वाढता खर्च यामुळे उत्पन्न आणि खर्च यांचा ताळमेळ राखणे कठीण होत आहे. पावसाची अनिश्चितता, पाणीटंचाई आणि दुष्काळाचे सावट यामुळे शेतकरीवर्ग असुरक्षिततेच्या छायेत आहे. एका बाजूला बाजारपेठेतील झगमगाट, संपत्तीचे प्रदर्शन आणि उपभोगवाद वाढतो आहे, तर दुसऱ्या बाजूला अन्न, पाणी आणि रोजगारासाठी संघर्ष करणारा समाजघटक आहे. सामाजिक अस्वस्थता, वाढता स्वार्थ आणि राजकीय क्षेत्रातील उथळ सत्ताकेंद्रित कुरघोड्यांमुळे सार्वजनिक जीवनातील विश्वासाला तडे जात आहेत. अशा परिस्थितीत लक्ष्मीपूजनाची प्रार्थना केवळ वैयक्तिक धनवृद्धीऐवजी आर्थिक स्थैर्य, श्रमाला प्रतिष्ठा, न्याय्य संधी आणि सर्वसमावेशक विकास अशा समृद्ध समाजासाठी असायला हवी. गरजू व्यक्तीला मदतीचा हात देणे, विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला हातभार लावणे, अडचणीत असलेल्या कुटुंबाला आधार देणे किंवा निराधाराच्या आयुष्यात आशेचा किरण निर्माण करणे यातून लक्ष्मीचे अधिक उदात्त रूप प्रकट होते. संपत्तीचा सर्वोच्च उपयोग तिच्या साठवणुकीत नसून तिच्यामुळे दुसऱ्याच्या जीवनात निर्माण होणाऱ्या सकारात्मक बदलात असतो. लक्ष्मीच्या स्वागतासाठी घराचा प्रत्येक कोपरा स्वच्छ केला जातो. मात्र या स्वच्छतेला मनाच्या स्वच्छतेची जोड मिळणेही आवश्यक आहे. भारतीय पुराणपरंपरेत लक्ष्मीच्या विरोधी संदर्भात अलक्ष्मीची संकल्पना येते. कलह, दारिद्र्य, अस्वच्छता, आळस आणि नकारात्मकता यांच्याशी तिचे नाते जोडले गेले आहे. आजच्या जीवनात या संकल्पनेचा अर्थ अधिक व्यापकपणे समजून घेता येतो. लोभ, मत्सर, अहंकार, द्वेष आणि स्वार्थ यामुळे घरातील शांतता नष्ट होते. सततचे वाद, अपमान आणि अविश्वास यातून नात्यांचे वैभव झाकोळते. बाहेरून सजलेले घर आणि आतून अस्वस्थ असलेली मने यात खरी समृद्धी असू शकत नाही. त्यामुळे लक्ष्मीपूजन म्हणजे मनातील कटुता, विचारांमधील संकुचितपणा आणि व्यवहारातील स्वार्थ दूर करण्याचाही संकल्प असायला हवा. आज सणांच्या साजरीकरणात खरेदी, सजावट आणि प्रदर्शन यांचे प्रमाण वाढले आहे. समाजमाध्यमांवरील झगमगाटामुळे सणांचा आनंदही म्हणजे केवळ प्रदर्शन बनले आहे. आर्थिक क्षमतेपेक्षा अधिक खर्च करून, कर्ज काढून किंवा केवळ प्रतिष्ठेसाठी महागड्या वस्तूंची खरेदी करून सण साजरा करण्याची गरज नाही. आपल्या ऐपतीनुसार, पर्यावरणाचा विचार करून आणि इतरांच्या आनंदात सहभागी होत सण साजरा करणे अधिक अर्थपूर्ण आहे. लक्ष्मीपूजन म्हणजे केवळ संपत्तीचे प्रदर्शन नाही. किंबहुना, संपत्तीचा सन्मान आणि योग्य विनियोग शिकवणारी ती पूजा आहे. तर पाडवा म्हणजे पती-पत्नीच्या नात्यांचे मोल जाणण्याचा दिवस आहे. दिवाळीचा प्रकाश घराबरोबरच आपले विचारही उजळवतो, तेव्हाच रोषणाईला खरा अर्थ तेव्हाच प्राप्त होतो. लक्ष्मीपूजन आपल्याला प्रामाणिक कमाई, विवेकपूर्ण उपभोग, श्रमांचा सन्मान आणि सामाजिक संवेदनशीलता शिकवते, तर पाडव्याचा सण उदारता, सहजीवन, परस्परआदर आणि नव्या संकल्पांची प्रेरणा देतो. या दोन्ही दिवसांचा संदेश एकमेकांपासून वेगळा नाही. संपत्तीने जीवनाला साधने मिळतात. पण त्या साधनांना अर्थ आपणच द्यावा लागतो. त्यामुळेच या दिवाळीच्या दिव्यांनी केवळ घराचे कोपरे उजळू नयेत, तर आपल्या विचारांतील अंधारही दूर व्हावा. लक्ष्मीपूजनातून धनाला पावित्र्य लाभावे आणि पाडव्याच्या मंगल क्षणी नात्यांना नव्या विश्वासाची पालवी फुटावी. समृद्धीचा प्रकाश आपल्या उंबरठ्यापुरता मर्यादित न राहता दुसऱ्याच्या आयुष्यातही आनंदाचे दीप उजळवणारा ठरावा.

दिवाळीनिमित्त अंध बांधवांना किराणा किटचे वाटप



समाचार/नगर-दि.७

समाजातील वंचित गरजू आणि दिव्यांग घटकांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणे हीच खरी समाजसेवा असल्याचे दर्शन घडवत दानशूर समाजसेविका अश्विनी आव्हाड यांच्या पुढाकारातून अंधजन मंडळातील अंध बांधवांना जीवनावश्यक किराणा किटचे वाटप करण्यात आले.

सध्याच्या महागाईच्या काळात अंध आणि दिव्यांग बांधवांना जीवनावश्यक वस्तूंची कमतरता भासू नये, तसेच दिवाळीचा सण आनंदाने साजरा करता यावा या उद्देशाने सुमारे २० ते २५ अंध बांधवांना किराणा किटचे वितरण करण्यात आले. या किटमध्ये गहू, तांदूळ, तेल, डाळी, साखर, चहापत्ती तसेच इतर आवश्यक वस्तूंचा समावेश होता.याप्रसंगी अश्विनी आव्हाड, सुनील मंगुडकर, वैशाली आव्हाड, भारती दरेकर, प्रथमेश मंगुडकर अंधजन मंडळाचे अध्यक्ष संभाजी भोर, राजेंद्र फळके, अनिल चाबुकस्वार,गोरख दरंदले,अप्पा फुफसे, गणेश जाधव, छाया धनवटे, मनिषा लोंढे, अनिता जाधव, दृष्टीसाथी मनेष वैराळ, आदी दिव्यांग बांधव उपस्थित होते.

अश्विनी आव्हाड यांनी मार्गदर्शन केले. प्रास्ताविक अनिल चाबुकस्वार यांनी केले, तर आभार प्रदर्शन गोरख दरंदले यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अश्विनी आव्हाड व त्यांच्या सहकारी मित्रमंडळाने विशेष परिश्रम घेतले.

पोलिस दलातील ९२ कर्मचाऱ्यांच्या बदल्या

समाचार/नगर-दि.७

जिल्हा पोलिस दलातील ९२ पोलिस अंमलदारांच्या विनंती बदल्या करण्यात आल्या आहेत. पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी शुक्रवारी याबाबतचे आदेश काढले आहेत. पोलिस शिपाई ते श्रेणी उपनिरीक्षक तसेच चालक पोलिस शिपाई ते चालक श्रेणी उपनिरीक्षक या संवर्गातील अंमलदारांच्या जिल्ह्यांतर्गत बदल्यांचा यामध्ये समावेश आहे. पोलिस दलातील शेकडो अंमलदारांनी विनंती बदली करण्यासाठी अर्ज केले होते. अधीक्षक सुदर्शन यांनी अर्ज केलेल्या अंमलदारांची अडचण जाणून घेतली होती. यानंतर ९२ पोलिस अंमलदारांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. अंमलदारांच्या विनंती व प्रशासकीय बदल्यांसाठी जिल्हा पोलिस आस्थापना मंडळाची गुरुवार बैठक झाली. या बैठकीत बदल्यासंदर्भात सविस्तर चर्चा होऊन जनहित, कायदा व सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी, प्रशासकीय निकड आणि पोलिस ठाण्यांमधील मनुष्यबळाची उपलब्धता या निकषांवर बदल्यांचे आदेश काढण्यात आले.

दिव्यासह आत्मज्योती लावूया-शुभ दीपावली

सर्व रसिक, सुजाण वाचकांना दीपावलीच्या हृदयपूर्वक शुभकामना. आपण सामान्य जनता. छोट्या छोट्या गोष्टीत आनंदाचे कारण शोधतो. दिवाळी हा तर सणांचाही सण. संपूर्ण भारतवर्षात वेगवेगळ्या राज्यात वेगवेगळ्या पध्दतीने दिवाळी साजरी होते.

आबालवृध्द नव्या उमेदीने, नव्या उत्साहाने, नवीन कपडे परिधान करुन, फराळ-मिठायांच्या मेजवानीत आणि आनंदाच्या नादात प्रदूषण करणाऱ्या व क्षणात पैशांची राखरांगोळी करणाऱ्या फटाक्यांच्या गोंधळात सामान्यतः दिवाळी साजरी करतात.



अजूनही जेथे जुनी पिढी आहे व त्यांच्या नेतृत्वात कुटुंब टिकून आहेत तेथे पारंपरिक रिती रिवाजाने दिवाळी साजरी होते. नव्या जमान्याचे हम दो वाले, नोकरी वाले रेडिमेड वस्तू आणून त्यातच दिवाळीचा आनंद शोधतात. संगणक ए आय क्रांतीमुळे व्यापारी वर्गाची चोपड्या-वह्यांचे पूजन कमी झाले असून आर्थिक वर्षे एप्रिलपासून झाल्यानंतर वही पूजन मुहूर्त इ. विरळ झाले आहे.

जैन धर्मीय या पर्वाला केवल ज्ञान प्राप्तीचा, सर्वोत्तम आध्यात्मिक सोहळा म्हणून पाहतो. रसिक वाचक विचारांची मेजवानी दिवाळी अंकांच्या माध्यमातून लुटतो तर विद्यार्थी वर्ग खेळण्यात दंग होतो. महिला वर्गांना घर सजवणे, गोडधोड करणे यातूनच धावपळ होते. त्यात नोकरी करणाऱ्या महिलांना तर अधिकच परिश्रम करावा लागतात. दिवाळीच्या निमित्ताने शारीरिक चंगळ करतांना थोडसं स्वतःत डोकवण्याचाही प्रयत्न व्हावा.

आपल्या एक गोष्ट लक्षात येतेय का? मंद दिव्याची ज्योत पाहताना जो आनंद होतो त्याची अनुभूती घेतलीय का? थोडंसं आत्मज्योतीबद्दल या निमित्ताने विचार करुया. दिव्यांच्या ज्योती पाहतांना जी शांतता, मानसिक निरागसत आणि आनंद मिळतो तर आपल्याच मनात डोकावतांना आत्म्याच्या व पर्यायाने परमात्म्याच्या ज्योतीचा आनंद अनुभवता आला तर? त्यासाठी प्रयत्न करण्यास काय हरकत आहे. यावर्षी आत्मज्योती पाहण्याचा विचार करुया.

दुसऱ्या शब्दात सांगायचे तर यंदाच्या व पुढच्या प्रत्येक दिवाळीत बौध्दिक, तत्वज्ञानात्मक विचारांच्या फराळांची मेजवानी घेण्याचा प्रयत्न करायला पाहिजे. पणतीच्या दिव्यासह आत्मज्योती प्रज्ज्वलित करुन प्रकाशमान जीवनासाठी प्रयत्नपूर्वक अभ्यास व्हावा.

यातून अध्यात्माची, तत्वज्ञानाची दृष्टी लाभते. तत्वज्ञान म्हणा वा अध्यात्म किंवा साध्या शब्दात श्रध्दा, भावभक्ती म्हणा सणासुदीच्या परंपरेतून त्यापर्यंत पोहोचणे शक्य असते.

तत्वज्ञान, अध्यात्म हे केवळ बुध्दीच्या आधारावर किंवा तर्कशास्त्राच्या कसोटीवर शब्दांच्या आधाराने विशद करायचा विषय नाही. हा अनुभूतीचा विषय आहे.

प्रथम आपल्याला रुचलेल्या, मानव कल्याणाच्या, राष्ट्र हित संस्कृती रक्षणाच्या दृष्टीने उचित असणाऱ्या (भासणाऱ्या नव्हे) विचारांचा मागोवा घ्यायचा हा प्रथम दिवा-सोपान-

नंतर त्या विचारांनी सर्वप्रथम आपल्या जीवनात परिवर्तन घडवून आणायचे हा द्वितीय सोपान- दुसरा दिवा... आपल्या आचारणाने अनुयायांवर स्नेही मित्र परिवारांवर प्रभाव पडून त्याचा परिणाम म्हणून आपल्या वृत्तीच आपल्या शिष्यांमध्ये संक्रमण होणे हा अंतिम सोपान- आत्मज्ञान, आत्मज्योतीच्या अनुभवाचा अखेरचा दिवा...

या प्रक्रियेने (पणतीच्या दिव्याने आत्मज्योतीची अनुभूती घेण्याचा) महान कार्य, व्यापक दृष्टिकोन करण्याचे प्रवृत्ती निर्माण होणे म्हणजे दीपोत्सवाचे फलित प्राप्त होणे असते. त्यासाठी ते तत्वज्ञान, ती प्रक्रिया आपल्या रोमारोमांत भिनणे आवश्यक आहे. त्यासाठी परिश्रम, तनमन अन्, आत्म्याची आराधना हाच एक मार्ग... सहज सुलभ असे काहीच नाही या मार्गावर...

आयुष्य सरत रहावं अगदी,
ओंजळीतून पाणी सुटावं जसं...
आपण मात्र त्याला फुलवतं राहावं
दीपज्योतीनं पणती उजळावं जसं...
संस्कार, परंपरा अन् विचारधन...
यांची आम्हा समृध्द शिकवण...
असे आम्हा संगे
आत्मज्योतीची साठवण...

- किशोर गांधी,
दिशान फिचर्स.



राशीभविष्य

- **मेष** : अपेक्षित वार्ता कानी येईल. विवाहाची बोलणी सफल होतील. नव्या व्यवहारात सावधगिरी बाळगावी.
- **वृषभ** : ग्रहमानाची अनुकूलता राहील. महत्त्वाचे निर्णय तातडीनं घ्यावेत. विद्यार्थ्यांना अपेक्षित यश मिळेल.
- **मिथुन** : साऱ्या गोष्टी मनाप्रमाणे घडतील. यंत्र, वाहनाचा वापर काळजीपूर्वक करावा. प्रकृती सांभाळावी.
- **कर्क** : स्थापत्य, कला क्षेत्रात संधी लाभेल. नव्या योजनांना गती मिळेल. प्रवासात पुरेशी काळजी घ्या.
- **सिंह** : उत्पन्नाच्या नव्या पर्यायांचा विचार होईल. सर्व गोष्टी उघड करू नका. मानसिक अस्वास्थ राहील.
- **कन्या** : नव्या जबाबदाऱ्या विचारपूर्वक स्वीकारा. वरिष्ठांची तुमच्यावर मर्जी राहील. अपेक्षित भेटी होतील.
- **तूळ** : हितशत्रूंच्या कारवाया वाढीस लागतील. विचारपूर्वक पावलं उचलावीत. व्यवसायात अडचणी येतील.
- **वृश्चिक** : कौटुंबिक वाद-विवाद टाळावे. आर्थिक करार लाभदायक ठरतील. घर दुरूस्तीकडे लक्ष राहील.
- **धनु** : दिवसाच्या सुरूवातीस दिलासा मिळेल. हितचिंतकांचा सल्ला ध्यानी घ्यायला हवा. चिंता करू नये.
- **मकर** : प्रयत्नात सातत्य आणि चिकाटी ठेवावी. कलांचा गौरव होईल. छोटा-मोठा प्रवास घडणार आहे.
- **कुंभ** : अपत्यांबाबत चिंता राहील. कामाचा व्याप वाढल्याने धावपळ होईल. आध्यात्मिकतेकडे ओढा राहील.
- **मीन** : नातलगांच्या गाठीभेटी होतील. नव्या योजना मार्गी लागतील. स्थावर, वाहन सौख्य लाभणार आहे.

ब्युटी टॉक

त्वचेचा कोरडेपणा दूर करण्यासाठी

✻ घरात तसंच ऑफिसमध्ये ह्युमिडिफायरचा वापर करा. यामुळे त्वचेतला ओलावा टिकून राहिल.

✻ बाजारात हायड्रेटिंग मास्क मिळतात. अशा मास्कच्या वापरामुळे तुमच्या त्वचेतला ओलावा टिकून राहिल.

✻ या दिवसात गरमागरम चहा-कॉफी प्यावीशी वाटते. पण यातल्या कॅफेनमुळे त्वचेतला ओलावा कमी होतो. त्यामुळे अशा पेयांचं सेवन मर्यादित प्रमाणात करायला हवं. तसंच भरपूर पाणी प्यायला हवं.

✻ वातावरणातल्या गारव्यामुळे तुमची त्वचा निस्तेज आणि कोरडी होऊ शकते. त्यामुळे बाहेर जाताना हातमोजे, पायमोजे, स्कार्फचा वापर करा. तसंच उन्हात बाहेर पडताना सनस्क्रीन लावा. याच दिवसात सूर्याच्या अतिनील किरणांचा जास्त त्रास होतो.

दिनविशेष

८ नोव्हेंबर

१९१९ : ख्यातनाम लेखक, दिग्दर्शक, निर्माता, संगीतकार, अभिनेता पु. ल. देशपांडे यांचा जन्मदिवस.

१९३९ : हिटलरच्या सभेत बाँबस्फोट घडवून त्याचा खून करण्याचा प्रयत्न फसला. या स्फोटात सात माणसे ठार, साठ जखमी.

१९७२ : अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षपदी निक्सन यांची फेरनिवड.

२०१३ : फिलिपिन्सला टायफून या चक्रीवादळाचा जोरदार तडाखा. सहा हजारांपेक्षाही अधिक लोक मृत्यूमुखी.

लाईफस्टाईल

झटपट होतील कामं

मुलांनो, तुम्हाला दिवसभरात बरंच काही करायचं असतं. सगळ्या कामांची यादी केली तर बरंच काही सोपं होऊन जाईल. वेळेचं नियोजन किंवा व्यवस्थापन वाटतं तितकं कठीण नक्कीच नाही.

✻ सर्वात आधी कामाचे प्राधान्यक्रम ठरवा. अभ्यास, खेळणं, मित्रमैत्रिणींसोबत गप्पा, चित्र काढणं, गाणी म्हणणं असं बरंच काही तुम्हाला करायचं असतं. आता यापैकी काय महत्त्वाचं आणि काय नंतर करता येईल हे ठरवा. महत्त्वाची कामं आधी करा. तुम्ही विद्यार्थी आहात. त्यामुळे अभ्यासाला महत्त्व द्यायला हवं.

✻ यानंतर कामाचं नीट नियोजन करा. पहिलं काम आधी करा, मग दुसरं काम अशाप्रकारे दिवसभराची कामं करत रहा. अशाप्रकारे आठवड्याचं नियोजन करा. तुमची कामं झटपट होऊ लागतील.

✻ प्रत्येक काम वेळेत पूर्ण करण्यावर भर द्या. गृहपाठ वेळेत पूर्ण झालाच पाहिजे. कोणतंही प्रोजेक्ट दिलेल्या तारखेच्या आधीच करून ठेवा. यामुळे तुमच्यावर ताण येणार नाही.

आरोग्यमंत्र

टाळा या आरोग्य त्रुटी

आरोग्यदायी जीवनासाठी नियमितपणे पुरेशा प्रमाणात पाणी पिणं गरजेचं असतं. परंतु सध्याच्या धावपळीच्या, कामाच्या वाढत्या ताण्याच्या जमान्यात या महत्त्वाच्या बाबींकडे अनेकांचं दुर्लक्ष होतं. रोजच्या धावपळीत घाईगडबडीने उभ्यानं पाणी पिणाऱ्यांची संख्याही कमी नाही. परंतु असं पाणी पिणंही हानीकारक ठरू शकतं. त्यामुळे निदान शांतपणे, खाली बसून पाणी पिण्यासाठी काही क्षणांचा अवधी नक्की हवा. त्यादृष्टीने उभ्यानं, घाईघाईत पाणी पिण्याचे दुष्परिणाम जाणून घेऊ...



✻ घाईघाईने आणि उभ्यानं पाणी प्यायल्यानं शरीराच्या सांध्यातील द्रव पदार्थांचं संतुलन बिघडतं. त्यामुळे अचानक क्रॅम्प येणं किंवा सांधे दुखणं यासारख्या समस्या निर्माण होतात.

✻ उभ्यानं पाणी पिण्यापेक्षा बसून पाणी पिण्यानं शरीराला लाभ होतात. याचं कारण अभ्यानं पाणी प्यायल्यास स्नायू तसंच मज्जासंस्थेवर ताण अधिक येतो. बसून पाणी प्यायल्यास असा ताण येत नाही. त्यामुळे पाण्याबरोबर शरीरातील इतर पदार्थ पचण्यास मदत होते.

✻ आयुर्वेदातही शांतपणे, खाली बसून पाणी प्यावं असा सल्ला देण्यात आला आहे. खाली बसून, शांतपणे पाणी प्यायल्यास शरीरातील आम्लाच्या प्रमाणात समतोल राखला जातो, असं आयुर्वेदशास्त्र सांगतं.

✻ उभ्यानं प्यायलेलं पाणी शरीरात वेगानं वाहून जातं. त्यामुळे किडनी आणि मूत्राशयातील घाण तशीच राहते. यातून मूत्रमार्ग किंवा किडनीत संसर्ग होऊ शकतो.

पंचांग

रविवार, ८ नोव्हेंबर २०२६
पराभवनाम संवत्सर शके १९४८, अश्विन कृ. १४ **(नरक चतुर्दशी, लक्ष्मीपूजन)**, चंद्रराशी : तूळ, नक्षत्र : स्वाती, योग : आयुष्मान, सूर्योदय ६.४४, सूर्यास्त ६.००

फॉरवर्ड्स

पत्तें ग़वाही देतें हैं क़ी हर चीज़ क़ा एक़ अपना वक़्त होतां हैं...

टूटने क़ा, बिख़रनेका, औऱ संवरनेका....!

ग्रूमिंग

सणासुदीचे दिवस आणि त्यानंतर येणारी लग्नसराई यासाठी तुम्ही तयारीत रहायला हवं. बाजारात एथनिक्सची बरीच व्हरायटी पहायला मिळते. तुम्हीही तुमच्या एथनिक्सना वेगळा टच देऊ शकता.

✻ पांढऱ्या रंगाची नेहमीच चलती असते. यंदाही या रंगाची जादू कायम असेल. शॉर्ट कुर्त्यापासून लाँग कुर्त्यापर्यंत पांढऱ्या रंगात तुम्ही बरंच काही ट्राय करू शकता. पांढऱ्यावर पांढरं नेहमीच चांगलं दिसतं. मात्र व्हाईट कुर्त्यावर क्रीम पँट असंही कॉम्बिनेशन करता येईल. एखादा स्टोल घेऊन लूकला वेगळा ट्विस्ट देता येईल. **(क्रमशः)**

करिअरवाटा

लिगल आऊटसोर्सिंगचा हटके पर्याय

अलिकडच्या काळात इतर क्षेत्रांप्रमाणे कायद्याच्या क्षेत्रातही काही नव्या संकल्पना रूढ होत आहेत. त्याद्वारे कारकिर्दीच्या नव्या, हटक्या वाटा उपलब्ध होत आहेत. त्याविषयी जाणून घ्यायला हवं. विशेषत: या क्षेत्रात लिगल प्रोसेस आऊटसोर्सिंगद्वारे वकिली क्षेत्रातील तज्ज्ञ आपल्या क्लायंट्सना उत्तम सेवा देऊ शकतात. लिगल प्रोसेस आऊटसोर्सिंग ही प्रोजेक्ट ओरिएंटेड रोजगारवाट आहे. यामध्ये एखादी कंपनी सर्व कायदेशीर बाबींची



पूर्तता करण्याची इत्थंभूत जबाबदारी एखाद्या वकिलाकडे अथवा वकिलांच्या एखाद्या गटाकडे देऊ शकते. या मार्गानं त्यांच्या कायदेशीर कामांमध्ये शिस्तबद्धता, अचूकता येते. काही वर्षांसाठी करार करून या संस्था एकमेकांच्या बरोबर काम करतात. लिगल रिसर्च, ग्राफ्टिंग, ॲनॅलिसिस, लिगल बॅकएंड ऑपरेशन्समध्ये एलपीओ महत्त्वाचं योगदान देतं. नवं तंत्रज्ञान, नव्या व्यावसायिक संकल्पनांद्वारे हे काम होत असल्यानं अचूकता वाढते. लिटिगेशन सपोर्ट, कॉर्पोरेट लिगल सपोर्ट, कॉंट्रॅक्ट मॅनेजमेंट, लिटिगेशन प्रॉपर्टी आदींमध्ये एलपीओची महत्त्वाची भूमिका असू शकते. अशा संस्थेत काम करण्यासाठी जागतिक पातळीवर खऱ्या उतरणाऱ्या बौद्धिक क्षमतेची गरज आहे. वेगळं करून दाखवण्याचा ध्यास असल्यास ही वाट चोखाळणं योग्य ठरेल.

खेचाखेची

सुट्टी

हिटलर एकदा एका ज्योतिषाकडे गेला आणि त्याला म्हणाला, मी कधी मरणार आहे ?

ज्योतिषी : सर, तुम्ही मराल त्या दिवशी ज्यू लोकांचा सुट्टीचा दिवस असेल.

हिटलर : तुला कसं माहित तो सुट्टीचा दिवस असेल?

.

.

ज्योतिषी : सर तुम्ही मराल त्या दिवशी आनंद साजरा करायला ते नक्कीच सुट्टी घेणार ना.

वेगळं काही

प्रदूषणाची दाहकता नवी पिढी अनुभवते आहे. अशा परिस्थितीत तिन्ही जगाचा स्वामी म्हणजेच परमेश्वरही घुसमटतोय. भाविकांची तरी अशीच श्रद्धा आहे. उन्हाळ्यात थंडावा देण्यासाठी देवाच्या मूर्तीला चंदनाचा लेप लावला जातो तर थंडीत स्वेटर, कानटोपी घातली जाते. म्हणूनच मध्यंतरी देवाला प्रदूषणाचा त्रास होऊ नये, म्हणून मास्क घालण्यात आले होते. काशी-मथुरेतल्या बऱ्याच मंदिरांमध्ये ही युक्ती लढवण्यात आली होती. मथल्या काळात वाराणसीतल्या हवेचा दर्जा घसरला होता. याचा त्रास सर्वसामान्यांना झालाच शिवाय देवही गुदमरला! प्रदूषणाची तीव्रता कमी करण्यासाठी प्रशासनाने शहराच्या काही भागात पाणी शिंपडलं.

भटकंती

बीचवरील भटकंतीपूर्वी...

सर्वसाधारणपणे डिसेंबर-जानेवारीचा कालावधी भटकंतीसाठी उत्तम मानला जातो. यात अनेकांना समुद्र किनारी फिरायला जायला आवडतं. समुद्रात डुंबायचं, वाळूत खेळायचं तर स्वीमिंग सूट, फ्लिप फ्लॉप, जास्तीचे कपडे असं साहित्य लागतं. पण यासोबत इतर काही वस्तूंची गरज भासते. या महत्त्वाच्या वस्तू कोणत्या जाणून घेऊ...



✻ ओल्या कपड्यांसाठी वेगळी बॅग ठेवा. पाण्यात खेळल्यावर स्विमिंग सूट आणि इतर कपडे ओले होतात. समुद्रावर वॉटर स्पोर्ट खेळताना कपडे ओले होतात. अशा वेळी अतिरिक्त बॅग असेल तर चेंज केल्यावर ओले कपडे ठेवणं सोपं जातं.

✻ मोकळ्या, स्वच्छ समुद्रकिनारी छत्रीखाली पडून रहायला खूप छान वाटतं. अशी मजा अनुभवणार असाल तर बीच कार्ट सोबत ठेवा. यामध्ये छत्री, खुर्ची, बीच बॅग आणि पाण्याची बाटली या वस्तू सहज बसतात. त्या कॅरी करणंही खूप सोपं जातं.

✻ समुद्रकिनारी उन्हाची तीव्रता जास्त असते. त्यामुळे सनस्क्रीन सोबत न्यायला विसरू नका. बाहेर पडताना चेहऱ्यावर सनस्क्रीन चोपडा. यामुळे त्वचा टॅन होणार नाही. पाण्यात जातानाही अंगाला सनस्क्रीन लावा.

Printed and Published by: Swati Mahendra Kulkarni, Printed at "Samachar" 4188, Maidan Aad, Ahilyanagar (Ahmednagar) (M Corp), Dist.Ahilyanagar (Ahmednagar), Pin Code - 414 001, Maharastra, Published at 4188, Maidan Aad, Ahilyanagar (M Corp), Dist Ahilyanagar (Ahmednagar), Pin Code- 414 001, Maharashtra. Editor- Swati Mahendra Kulkarni, Phone - (0241) 2345270, 2347086, Mob.- 9822470074.
हे मराठी सायंदैनिक, मुद्रक, प्रकाशक स्वाती महेंद्र कुलकर्णी यांनी ''समाचार'' ४१८८, मैदान आड, अहिल्यानगर (अहमदनगर) (एम कॉर्प), जिल्हा-अहिल्यानगर (अहमदनगर), पिन कोड- ४१४ ००१, महाराष्ट्र येथे मुद्रित करून ४१८८, मैदान आड, अहमदनगर (एम कॉर्प) जिल्हा- अहमदनगर, पिन कोड- ४१४ ००१, महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक- स्वाती महेंद्र कुलकर्णी. दूरध्वनी- २३४५२७०, २३४७०८६, मो.- ९८२२४७००७४ E-mail - mahendra.samachar@gmail.com

समाचार

शनिवार, दि. ७ नोव्हेंबर २०२६ पान ३

अर्ज़ किया है...

अंधेरे को चीरकर जो रोशनी आए,
वही दीप हर उम्मीद जगा जाए।

- अज्ञात

अंधाराला चिरत जो प्रकाश बाहेर पडतो, तोच प्रत्येक दिवा आपल्या मनात नव्या आशा आणि उमेद जागी करो. आपल्या स्वप्नांना नवा मार्ग दाखवो.

सर्व वाचकांना दीपोत्सवाच्या हार्दिक शुभेच्छा !

ए आय घसरले !



भारतीय गुंतवणूकदार ज्या गोष्टीची आतुरतेने वाट पाहत होते त्याची प्रतीक्षा संपताना दिसू लागली आहे. ३ नोव्हेंबरला अमेरिकेत झालेल्या निवडणुकीत ट्रम्प यांचा पराभव झाल्याने त्यांच्या मनमानीला आता आळा बसणार आहे. ट्रम्प यांच्या पराभवामुळे तेथील सरकार कडून नवीन डेटा सेंटर तसेच कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वाढीबाबत नवे कोणते गतीरोधक तयार होतात याची चिंता आता एआय क्षेत्रात गुंतवणूक करणाऱ्या गुंतवणूकदारांना सतावू लागली आहे. अमेरिकेतील डेटा सेंटर्सची कामे मंदावल्यास तेथील एआयचिप्स, वीज व संबंधित उत्पादने व सेवांची मागणी कमी होईल. एनव्हिडिया, एएमडी सारख्या शेअर्समध्ये मोठी घसरण दिसून येत आहे. अमेरिकेसोबतच मागील दोन वर्षात तेजी पकडलेले तैवान, कोरियासारख्या बाजारावरही



या निकालांचा नकारात्मक परिणाम दिसून येत आहे. भारतीय शेअर बाजारासाठी मात्र हा रिलेटिव्ह सेफ हेवन परिणाम ठरू शकेल. जागतिक ए आय मूल्यांकनबाबत सुरू झालेल्या गोंधळात विदेशी गुंतवणूकदार पुन्हा एकदा स्थायी उपभोगकेंद्रित भारतीय बाजारात किती गुंतवणूक वाढवितात यावर भारतीय बाजारांची मध्यमकालीन तेजी ठरणार आहे. दीर्घकाळासाठी म्हणजेच पाच २५ वर्षांचा गुंतवणुकीसाठी विचार केल्यास भारतीय बाजार कायम तेजीतच आहेत.

हजारो वर्षांपासून भारतीय परंपरेत सण- उत्सवांचे महत्त्व यातून पुन्हा पुन्हा अधोरेखित होते. बारशापासून तर १२ व्या पर्यंत आणि छोट्या खेड्यातील गावच्या ग्रामदेवतेच्या जत्रेपासून महानगरापर्यंत साजऱ्या केल्या जाणाऱ्या दिवाळीसारख्या उत्सवात मजूर, रंगारी, सुतार, विद्युत रोषणाई करणारे, स्वतःचे छोटा मोठा व्यवसाय करणारे, शेतातल्या खऱ्या फुलमाळांपासून आजच्या आधुनिक सजावटीपर्यंतच्या कामकाजाशी जोडलेल्या सर्वांच्याच हातात पैसा फिरत राहणे ही अर्थशास्त्राच्या चष्म्यातून महत्त्वाची गोष्ट आहे. मागील दोन वर्षातील भारतीय शेअरबाजारातील मंदी आता लगेचच दूर होणार का ? याचे उत्तर लगेच मिळणार नसले तरी दीर्घकालीन म्हणजेच पाच पंचवीस वर्षाचा विचार केल्यास जागतिक गुंतवणूकदारांना भारतासारखा दुसरा उत्तम पर्याय असू शकत नाही.

भारतीय शेअरबाजार किंवा इक्विटी म्युच्युअल फंडनी मागील काही दशकांचा इतिहास पाहिल्यास अनेक वेळा पाच-पाच वर्ष परतावा दिलेला नाही पण त्याची भरपाई पुढील एक-दोन वर्षांतच करून इक्विटी दीर्घकालीन इतर मालमत्तेच्या तुलनेत सरस गुंतवणूक ठरली आहे. पंधरा दिवसांपूर्वी भारतीय शेअरबाजारांवर अत्यंत नकारात्मक असणाऱ्या गुंतवणूकदारांनी आता आठ दिवसातील तेजीने हुरळून जाऊन लगेच गुंतवणूक करण्यापेक्षा गुंतवणूक करण्यापूर्वी जोखीम व्यवस्थापन तपासून गुंतवणूक केल्यास त्यांची दीर्घकालीन संपत्ती निर्माण होण्यास मदत होईल !

समाचारच्या सर्व वाचकांना दिवाळीच्या मंगलमय शुभेच्छा !

- राजेश देशपांडे
देशपांडे इन्व्हेस्टमेंट, अ.नगर
M.9850724890

समाचार
वाचकांना नम्र सूचना

समाचार वृत्तपत्रातून प्रसिध्द होणाऱ्या विविध जाहिरातीतील मजकुराची शहानिशा करुनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची **समाचार** वृत्तपत्र कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पूर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्यांच्या परिणामाबद्दल **समाचार** वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाहीत. याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

पदाधिकाऱ्यांच्या कारभारावर संताप; व्याजदरवाढीचा निषेध

माध्यमिक शिक्षक सोसायटीसमोर सत्ताधारी गटाचेच आंदोलन



समाचार/नगर-दि.७

पंचवीस वर्ष प्रा. भाऊसाहेब कचरे यांच्या नेतृत्वाखाली असलेल्या पुरोगामी मंडळाची सत्ता घालवून दीड वर्षांपूर्वी एक हाती सत्ता मिळविलेल्या परिवर्तन मंडळाला दिवाळीच्या तोंडावर सभासदांच्या निषेध आंदोलनाला सामोरे जावे लागले.

विशेष म्हणजे हे निषेध आंदोलन सत्ताधारी परिवर्तन मंडळाचे नेते, तसेच तज्ञ संचालक उद्धवराव सोनवणे यांच्या अध्यक्षतेखाली झाले. या आंदोलनात पुरोगामी मंडळाचे व सत्ताधारी परिवर्तन मंडळाचे कार्यकर्तेही उपस्थित होते.

आम्ही सत्तेत आलो की व्याजदर ७% पेक्षा कमी करू, लाभांश वाढवून देऊ अशी आश्वासने देऊन परिवर्तन मंडळाने सत्ता मिळवली. परंतु प्रत्यक्षात सभासदांना कुठलीही पूर्व सूचना न देता गुपचूपपणे एक टक्का व्याजदरात वाढ व सरसकट एक हजार रुपये वर्गणीत वाढ केल्यामुळे परिवर्तन मंडळाला निवडून देऊन आमचा भ्रमनिरास झाला आहे, अशी भावना आंदोलनकर्त्यांनी व्यक्त केली.संचालक मंडळाच्या या निर्णयामुळे सभासदांना दरमहा तीन ते चार हजार रुपये आर्थिक भुर्दंड पडत असून सलग दोन सर्वसाधारण सभेनंतर लाभांश सुद्धा कमी दिला. कृतज्ञता निधी वसुलीमध्ये दुपटीपेक्षा जास्त वाढ करूनही प्रत्यक्षात देताना मात्र वाढ रोखली.

या आंदोलनात प्रा. भाऊसाहेब कचरे, माजी चेअरमन सूर्यकांत डावखर, उत्तमराव खुळे, दिलीपराव काटे, कैलास राहणे, वाल्मीक बोठे, काकासाहेब घुले, धनंजय मस्के, केशव गुंजाळ, सतीश सप्रे, संजय वाळे, पारुनाथ ढोकळे, वैभव सांगळे, अविनाश साठे, उद्धवराव सोनवणे, संजय भुसारी, गणेश म्हसे, प्रदीप टाके, संभाजी टाकळकर, नवाब शहा, कुलदीप देशमुख, बाळासाहेब कोकरे, रामदास कोरडे, सोपानराव काळे, राजेंद्र लोहकरे यांच्यासह पुरोगामी व परिवर्तन मंडळाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उपमहापौर ॲड. धनंजय जाधव यांचा सत्कार

ख्रिस्ती समाजाच्या दफनभूमीच्या स्वच्छतेची उपमहापौरांकडून दखल



समाचार/नगर-दि.७

शहरातील सिद्धार्थनगर येथील ख्रिस्ती समाजाच्या दफनभूमीच्या दुरवस्थेची दखल घेत उपमहापौर ॲड. धनंजय जाधव आणि महापालिका आयुक्त यशवंत डांगे यांच्या पुढाकारातून दफनभूमी परिसराची स्वच्छता करण्यात आली. प्रशासनाने घेतलेल्या या सकारात्मक भूमिकेबद्दल अहमदनगर पहिली मंडळी ख्रिस्ती समाजाच्या वतीने उपमहापौर ॲड. धनंजय जाधव यांचा सत्कार करून आभार व्यक्त करण्यात आले.

यावेळी ख्रिस्ती समाजाच्या वतीने दफनभूमीच्या सर्वांगीण विकासाचा प्रश्न उपस्थित करण्यात आला. सिद्धार्थनगर येथील दफनभूमीचे सुशोभीकरण करून परिसरात विद्युत खांबांची व्यवस्था, अंतर्गत रस्त्यांची निर्मिती, सभा हॉल उभारणी तसेच पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी निवेदनाद्वारे उपमहापौर धनंजय जाधव यांच्याकडे करण्यात आली.

याप्रसंगी बोलताना उपमहापौर धनंजय जाधव यांनी ख्रिस्ती समाजाच्या विविध विकासकामांसाठी आवश्यक निधी उपलब्ध व्हावा, यासाठी पालकमंत्र्यांकडे मोठ्या निधीची मागणी करण्यात येईल, असे आश्वासन दिले. तसेच दफनभूमीच्या सुशोभीकरणासाठी आवश्यक त्या विकासकामांचा पाठपुरावा करण्याची भूमिका त्यांनी व्यक्त केली.

या सत्कारप्रसंगी रेव्हरंड सनी मिसाळ, रेव्हरंड संजय मिसाळ, प्रसाद काळे, शाहुल बनकर, ठोंबरे सर, अमोल काळे, लोकेश बर्वे, नितीन खंडागळे, विजय सतराळकर, राजू देठे, विनीत मकासरे, दीपक साळवे, रमेश भोसले, राजेश उजागरे, पास्टर विजय काकडे, सुनील बनसोडे, विशाल केदारी, राजेश ओहोळ यांच्यासह ख्रिस्ती समाजातील अनेक प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते.

निर्मला बोरा यांचे संथारा व्रतात निधन

समाचार/नगर-दि.७

येथील अशोक बन्सीलाल बोरा (मनोराज वाला) यांच्या धर्मपत्नी निर्मला अशोक बोरा यांचे शुक्रवार दि. ६ नोव्हेंबर २०२६ रोजी सायंकाळी ५.३८ वाजता संथारा व्रतात निधन झाले. त्यांनी प्रबुद्ध विचारक पूज्य आदर्शऋषीजी म.सा. यांच्या मुखारविंदने संथारा घेतला होता. त्या ७१ वर्षांच्या होत्या. त्यांच्या पश्चात पती



अशोक बोरा, २ मुले मनोज व राजेश बोरा, विवाहित मुलगी सुजाता सचिन गांधी, दीर प्रकाश व दिलीप बोरा, पुतणे सीए परेश बोरा, सीए रुपेश बोरा, सुना, नातवंडे रोहित बोरा, श्रृती बोरा, निर्वी बोरा असा मोठा परिवार आहे. त्या अतिशय धार्मिक व सेवाभावी वृत्तीच्या होत्या. त्यांच्यावर रात्री जैन परंपरेनुसार अंत्यसंस्कार करण्यात आले.

पान १ वरुन

८ लाख शेतकऱ्यांच्या बँक खात्यात ४०३ कोटी रूपये जमा

जिल्ह्याचा समावेश झाल्याने शासनाकडून तातडीने आर्थिक मदत उपलब्ध करून देण्याबाबतही त्यांनी पाठपुरावा केला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील राज्य शासनाने शेतकऱ्यांच्या अडचणी लक्षात घेऊन मदत वितरणाची प्रक्रिया राबविली. त्यानुसार जिल्ह्यातील सुमारे ८ लाख ७ हजार २८४ शेतकऱ्यांच्या खात्यांमध्ये प्रत्येकी पाच हजार रुपयांप्रमाणे ४०३ कोटी ६४ लाख रूपये जमा झाले आहेत. थेट लाभ हस्तांतरणाच्या माध्यमातून ही मदत वितरित झाल्याने शेतकऱ्यांना आर्थिक आधार मिळाला आहे.शेतकऱ्यांवरील संकटाच्या काळात त्यांना केवळ आश्वासन न देता प्रत्यक्ष आर्थिक मदत मिळवून देणे आवश्यक आहे, ही भूमिका पालकमंत्री विखे पाटील यांनी सातत्याने मांडली आहे. जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थिती, पिण्याचे पाणी, जनावरांसाठी चारा, वीजपुरवठा आणि शेतीच्या नुकसानीसंदर्भात प्रशासनाच्या माध्यमातून विविध उपाययोजनांचा आढावा मंत्री विखे पाटील सातत्याने घेत आहेत. आर्थिक मदतीमुळे शेतकऱ्यांना तातडीच्या गरजा भागविण्यासाठी आधार मिळणार असून आगामी शेती हंगामाच्या तयारीसाठीही या रकमेचा उपयोग होऊ शकतो. उर्वरित पात्र लाभार्थ्यांपर्यंतही मदत पोहोचविण्यासाठी प्रशासनाने आवश्यक कार्यवाही करावी, अशा सूचना पालकमंत्री विखे पाटील यांनी दिल्या आहेत.

दीनदयाळ पतसंस्थेतर्फे सत्कार

दिशान गांधी यांचे यश भूषणावह - वसंत लोढा



समाचार/नगर-दि.२६

देशातील पहिल्याच केपीएल मधील दिल्ली धुरंधर संघाच्या विजेतेपदात सिंहाचा वाटा उचलल्यानंतर लगेचच झालेल्या आंतरराष्ट्रीय फेडरेशन चषक कॉर्फबॉल स्पर्धेत महाराष्ट्राचे नेतृत्व करत विजेतेपद मिळवून देत दिशान गांधी यांनी कॉर्फबॉल खेळात आंतरराष्ट्रीय पातळीवर देदीप्यमान यश मिळवले आहे.त्यामूळे दिशान गांधी हे अहिल्यानगरचे भूषण ठरले आहेत.दिशान गांधी यांची आंतरराष्ट्रीय स्पर्धेतील कामगिरी अहिल्यानगर साठी घोषणा व बाब आहे.असे प्रतिपादन भाजपचे ज्येष्ठ नेते तथा पंडित दीनदयाळ परिवाराचे संस्थापक वसंत लोढा यांनी केले.

पंडित दीनदयाळ पतसंस्था व पंडित दीनदयाळ परिवार प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय फेडरेशन चषक कॉर्फबॉल स्पर्धेत महाराष्ट्राचे नेतृत्व करत विजेतेपद मिळवून देणाऱ्या दिशान किशोर गांधी यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी भाजपचे ज्येष्ठ नेते तथा पंडित दीनदयाळ पतसंस्थेचे चेअरमन वसंत लोढा, पंडित दीनदयाळ परिवाराचे अध्यक्ष धनंजय तागडे, सचिव बाळासाहेब भुजबळ, कार्याध्यक्ष सुरज अग्रवाल, मिलिंद कोलते,किशोर गांधी, पतसंस्थेचे संचालक अनंत होशिंग,व्यवस्थापक निलेश लाटे,सहव्यवस्थापक सुखदेव दरेकर,उमेश मेरगु, गणेश जंगम, अजय आडेप आदी उपस्थित होते.

गोकुळ काळे यांनी भाषण केले, तर किशोर गांधी यांनी दिशानच्या खेळातील वाटचालीची माहिती दिली.अनंत होशिंग यांनी आभार मानले.

मोहिनी खेडकर हिचे शैक्षणिक यश अभिमानास्पद-कर्डिले

समाचार/नगर-दि.७

वैद्यकीय शिक्षण क्षेत्रात कर्डिले ब्युरो नर्सिंग होम, यश प्यारा मेडिकल इन्स्टिट्यूट, यश अलाईड आणि शुभ नर्सिंग या संस्थांच्या माध्यमातून अत्यंत उल्लेखनीय कार्य सुरू आहे. गरीब, गरजू व होतकरू विद्यार्थ्यांना वैद्यकीय शिक्षणाची संधी उपलब्ध करून देत त्यांचे भविष्य घडविण्याचे काम या संस्थांच्या माध्यमातून होत आहे. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष माननीय बाबुराव कर्डिले आणि मंगल कर्डिले यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेले हे कार्य कौतुकास्पद आणि प्रेरणादायी असल्याचे मत मोहिनी खेडकर हिच्या पालकांनी व्यक्त केले.

संस्थेच्या ए.डी.एम.एल.टी. (उच्चडढ) अभ्यासक्रमाच्या शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये कु. मोहिनी मल्हारी खेडकर हिने शैक्षणिक गुणवत्तेत प्रथम क्रमांक पटकावून उल्लेखनीय यश संपादन केले. या यशाबद्दल



तिचे पालकांनी आनंद व्यक्त करत संस्थेच्या वतीने मिळालेल्या मार्गदर्शनाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

मोहिनीचे वडिल मल्हारी खेडकर म्हणाले की, मुलीच्या यशामागे तिची मेहनत, जिद्द, चिकाटी आणि सातत्यपूर्ण अभ्यास यांचा मोठा वाटा आहे. मात्र, विद्यार्थ्यांच्या यशामध्ये शिक्षक, प्राचार्य आणि संस्थेच्या व्यवस्थापनाचे योगदानही तितकेच महत्त्वाचे असते. या संस्थेत विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान दिले जात नाही, तर शिस्त, संस्कार, आत्मविश्वास आणि जीवनात यशस्वी होण्यासाठी आवश्यक असणारे मार्गदर्शनही केले जाते. त्यामुळेच विद्यार्थ्यांना आपल्या स्वप्नांना गवसणी घालणे शक्य होत आहे.

संस्थापक अध्यक्ष बाबुराव कर्डिले, मंगल कर्डिले, प्राचार्य, सर्व शिक्षकवृंद आणि शिक्षकेतर कर्मचारी यांच्या मार्गदर्शनामुळे मोहिनीला हे यश संपादन करता आले. याबद्दल त्यांनी सर्वांचे आभार मानले. प्रास्ताविक कोमल पंचमुख यांनी केले.

'चला दुकानदार होऊ या' उपक्रमाला प्रतिसाद

बालदोस्तांच्या कल्पकतेला मिळाले व्यासपीठ

समाचार/नगर-दि.७

विद्यार्थ्यांमध्ये व्यावसायिक दृष्टिकोन, आर्थिक व्यवहारांचे ज्ञान आणि स्वावलंबनाची भावना रुजविण्याच्या उद्देशाने पालवी शिशुविहारच्या वतीने आयोजित 'चला दुकानदार होऊया २०२६' या अभिनव उपक्रमाला यंदा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या उपक्रमाचे यंदा पाचवे वर्ष असून, दरवर्षीपेक्षा अधिक उत्साहात आणि उत्तम प्रतिसादात हा उपक्रम पार पडला. नगर शहरातील विविध शाळांमधील इयत्ता पाचवी ते नववीच्या विद्यार्थ्यांनी या उपक्रमात सहभाग घेतला. विद्यार्थ्यांनी उभारलेल्या तब्बल ११० स्टॉल्समधून विविध वस्तू आणि खाद्यपदार्थांची विक्री करण्यात आली. या माध्यमातून बालदोस्तांनी प्रत्यक्ष दुकानदारीचा अनुभव घेतला.

दिवाळीच्या पूर्वसंध्येला पालवी शिशुविहारचे प्रांगण विविध रंगीबेरंगी वस्तू, आकर्षक सजावट आणि खाद्यपदार्थांच्या दुकानांनी सजले होते. विशेषतः खाऊगल्लीतील पदार्थांच्या सुगंधाने परिसरात चैतन्य निर्माण झाले होते. विद्यार्थ्यांनी स्वतः दुकाने थाटून वस्तूंची विक्री केली. यातून त्यांना ग्राहकांशी संवाद साधणे, वस्तूंची किंमत ठरविणे, पैशांचे व्यवहार करणे आणि विक्री व्यवस्थापन यांचा प्रत्यक्ष अनुभव मिळाला.

या उपक्रमात सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी काही नियम निश्चित करण्यात आले होते. विक्रीसाठी ठेवण्यात येणाऱ्या वस्तूंची किंमत १०० रुपयांच्या आत असणे आवश्यक होते. सर्व व्यवहार रोखीने करायचे होते. तसेच प्रदूषण करणाऱ्या किंवा निसर्गाची हानी करणाऱ्या वस्तूंच्या विक्रीला परवानगी नव्हती. खाऊगल्लीमध्येही फास्ट फूड, बेकरी पदार्थ आणि शीतपेयांच्या विक्रीवर बंदी घालण्यात आली होती. त्यामुळे पौष्टिक आणि चविष्ट पदार्थांनाही ग्राहकांची पसंती मिळू शकते, तसेच कमी किमतीत विविध वस्तूंची विक्री करता येते, याची जाणीव विद्यार्थी आणि पालकांना झाली. ऑनलाइन पेमेंटच्या काळात ग्राहकांनीही पुन्हा एकदा रोखीने व्यवहार करण्याचा अनुभव घेतला.

उत्तम दुकानदारी करणाऱ्या निवडक सहा विद्यार्थ्यांना प्रोत्साहन म्हणून 'बेस्ट दुकानदार' पुरस्काराने गौरविण्यात आले. यावेळी परीक्षक म्हणून सौ. अश्विनी भालेराव यांनी काम पाहिले. अर्थात, या उपक्रमात सहभागी झालेला प्रत्येक विद्यार्थी आपापल्या परीने सर्वोत्तमच होता. बालदुकानदारांना व्यवसायाची प्रेरणा मिळावी, यासाठी दरवर्षी उद्योग आणि व्यवसाय क्षेत्रातील नामवंत व्यक्तींना प्रमुख पाहुणे म्हणून आमंत्रित केले जाते. यंदा प्रसिद्ध उद्योजक ॲड. जयवंत भापकर, हेमचंद्र इंगळे आणि रमणलाल भंडारी यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देत प्रोत्साहन दिले. तसेच अमित मुथा, शरद झोटिंग आणि राजेंद्र सोनार यांच्या उपस्थितीने विद्यार्थ्यांचा उत्साह द्विगुणित झाला. कार्यक्रमाचे आयोजन पालवी शिशुविहारच्या वतीने करण्यात आले होते. उद्घाटन सत्राचे सूत्रसंचालन कु. श्रुती



खिस्ती यांनी केले. प्रास्ताविक मुग्धा घोटणकर यांनी केले, तर आभार वैद्य अनिकेत घोटणकर यांनी मानले.

राम एजन्सी; ४९ वर्षांचा प्रवास

सेवेतून नातं जपणारा विश्वास



समाचार/नगर-दि.७

दिवाळी म्हणजे मोठा सण, या काळात इलेक्ट्रॉनिक वस्तूंनाही मोठी मागणी असते. इलेक्ट्रॉनिक वस्तूंमध्ये गेली ४९ वर्षे पासून राम एजन्सीने लोकांचा आनंद द्विगुणित करण्याचे काम केले आहे. एलईडी टीव्ही, फ्रीज, वॉशिंग मशीन, मायक्रोओव्हन, एसी, मोबाईल, लॅपटॉप, होम थिएटर, याचबरोबर इलेक्ट्रॉनिक वस्तूचे अधिकृत डिस्ट्रीब्यूटर म्हणून राम एजन्सीचे नाव आहे. दिवाळीनिमित्त राम एजन्सी मध्ये भरपूर ऑफरही आहे. तसेच प्रत्येक खरेदीवर विशेष डिस्काउंट आणि वेगवेगळ्या कंपन्याच्या तात्काळ फायनान्स सुविधाही उपलब्ध आहेत. कॅशबॅक ऑफर, क्रेडिट कार्डद्वारे पेमेंट, सेम डे डिलिव्हरी तसेच विविध खरेदी योजनांचा लाभ घेता येतो. ग्राहकांनी वस्तू खरेदीसाठी राम एजन्सीच्या शॉपला भेट दिल्यानंतर वस्तूंच्या अनेक व्हरायटीज बघायला मिळतात. ग्राहकांचा विश्वास, दर्जेदार उत्पादने आणि उत्कृष्ट सेवांच्या बळावर नगर जिल्ह्यात इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्रात आपली वेगळी ओळख निर्माण करणारी राम एजन्सी यशस्वी वाटचाल करत असून, नगर शहरात नवी पेठ, सावेडी आणि मार्केट यार्ड अशा तीन प्रमुख ठिकाणी भव्य शोरूम्स आहे. राम एजन्सीची खरेदी अधिकृतरित्या डायरेक्ट कंपनीकडून होते. त्यामुळे शोरूम्स मध्ये फर्स्ट क्लास क्वॉलिटीच्या वस्तू उपलब्ध असतात, जेणेकरून ग्राहकांना दीर्घकाळ सर्व्हिस देण्यास सोयीस्कर होते. त्यामुळे ग्राहकांचे समाधान होते राम एजन्सीमध्ये कुठल्याही प्रकारच्या दुय्यम वस्तू किंवा माल विकला जात नाही.

ग्राहकांना विविध नामांकित ब्रँडची उत्पादने उपलब्ध करून देण्यात आली आहेत. ग्राहकांच्या अडचणींचे त्वरित निराकरण आणि सेवेत सातत्य राखण्यामुळे राम एजन्सीने ग्राहकांच्या मनात विश्वासाचे स्थान निर्माण केले आहे. आणि म्हणूनच गेली ४९ वर्षात बाजारपेठेत बरेच बदल झाले असूनही सातत्याने टिकून राहून आम्ही असंख्य ग्राहकांच्या विश्वासास पात्र ठरलो आहेत.

४९ वर्षांचा हा प्रवास म्हणजे दीर्घकाळ खरेदी करून ग्राहकांनी दाखवलेला विश्वास, प्रेम आणि सहकार्य यांची पावती आहे. बदलत्या तंत्रज्ञानासोबत आधुनिक उत्पादने आणि उत्तम सेवा देण्याचा राम एजन्सीचा प्रयत्न भविष्यातही असाच सुरू राहणार आहे.

राम एजन्सीचे नगर जिल्ह्यात तालुका निहाय वितरकाचे जाळे असून, ग्राहकास खरेदी सुलभ करण्याचा सातत्याने प्रयत्न केला असल्याचे, संचालक राम मेघांनी यांनी सांगितले



धनत्रयोदशीच्या शुभमुहूर्तावर चंदुकाका ज्वेल्स, सावेडी येथील सुवर्णदालनातील चांदी विभागात चांदी खरेदी करण्यासाठी ग्राहकांनी मोठी गर्दी केली होती.

UNITED PHARMA
Surgical & Generic Medicine
Pharmaceutical Distributors
Near Kedgaon Ves, Kedgaon
UNITED PHARMA
9049934444
7972378081
9822020649

दीपावलीच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा
स्पेशल गुलाबजाम
गावराण तुपातील जिलेबी । चुरमा
बुंदी लाडू । स्पेशल कंदी पेढे
बेसन लाडू । खवा लाडू । लसून शेव
चकली । बाकरवडी । करंजी । शंकरपाळे
घरगुती लक्ष्मीपुजनासाठी मिठाई बॉक्स
गावरान तुपातील मिठाई मिळण्याचे एकमेव ठिकाण
बन्सी महाराज मिठाईवाले
रामचंद्र खुंट, अहिल्यानगर
9860939981, 9881761101
खास दीपावली करिता

बंगला भाड्याने देणे आहे
प्रोफेसर कॉलनी चौकातील
५ रूम्सचा बंगला
भाड्याने देणे आहे
-: संपर्क :-
9422083288

टीप : मुव्ही शो च्या वेळा बदलू शकतात
दि.०५/११/२०२६ ते दि.११/११/२०२६
RAMAYANA (हिंदी)
(3D) 7.00 AM । 10.45 AM । 02.30 PM 06.15 PM । 10.00 PM
(2D) 08.00 AM । 8.45 AM । 10.00 AM 11.45 AM । 12.30 PM । 01.45 PM 03.30 PM । 04.15 PM । 05.30 PM 07.15 PM । 08.00 PM । 09.15 PM 11.00 PM । 11.35 PM
for screen No. 3 All Recliner Pay 50 Extra & Get 150 Food Voucher *
- Offer Vaild On Window Booking & Phone Booking
Ahilyanagar's First & Most Luxurlous Cinematic Paradlse
CONNPLEX
3" Floor, Kohinoor Mall, Premdan chowk, Savedi, A. Nagar.
Mo. 6353564618 / 7790094001 / 7790094002

अॅडव्हान्स बुकिंग सुरू
MY cinema
AHILYANAGAR'S 1ST 5-SCREEN MULTIPLEX
Pipeline Road, Ahilyanagar. Onling Booking - BookMyShow
Show - 7/11/2026 to 12/11/2026
RAMAYANA (2D) - 7:30, 8:00, 8:45, 11:00, 11:30 am, 12:15, 2:30, 3:00, 3:45, 6:00, 6:30, 7:15, 9:30, 10:00, 10:45 pm,
RAMAYANA (3D) - 8:30 pm, 12:00, 3:30, 7:00, 10:30 pm.
Booking No. : 9325085347 । टीप : मुव्ही शो च्या वेळा बदलू शकतात.

Loans upto 100 crores
Loan against any Residential / Commercial / Industrial Property
Loan for Hospitals / Hotels / Schools / Colleges / N. A. Plots
Commercials Purchase / Lease Rental Discounting
Construction Finance For Builders
Business Loan / Home Loan
MONEY MATTERS
CAPITAL MASTERS
201, Girnar House, 2nd Floor, Above CSB Bank, Market Yard Road, Near Hotel Ustav, Pune 37.
205, 2nd Floor, Parmesh Plaza Hatti Ganpati Chowk, Sadashiv Peth, Pune - 30.
180, Bhawani Peth, Palkhi Vithoba Chowk, Pune - 411042
Abhijeet Jain Avinash Gandhi Kapil Singh
9881498790 / 9881498791 / 8087073646 www.moneymattersindia.in

Premier Energies
Alark Technologies Pvt Ltd
Exclusive Diwali Offer
15% OFF
Cash discount upto 15%
for first 50 Bookings of Solar PV System
Booking Amount*
BOOK NOW ₹15000
Gpay – 9923019911
दिपावलीनिमित्त आमचे ग्राहक, हितचिंतक, मित्रपरिवास हार्दिक शुभेच्छा
Solar PV Systems | Solar Water Heating Systems |Heat Pumps | Solar Street Lights | Solar Home Light
101, Parvati Towers , Near Renavikar Colony , Pipeline Road , Savedi , Ahilyanagar
9422224884
9823054741
Terms and conditions applied*

दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा...

RNI No. 6153/57

समाचार

SAMACHAR

दीपावली शुभेच्छा

Volume - 75 | Issue- 70 | Marathi Daily | Saturday 7/11/2026 | Pages - 4+4 | Price- Rs. 3

सर्व नामांकित ब्रँण्डस् फक्त राम एजन्सी मध्येच...

49 वर्षांची विश्वासाची परंपरा...



राम एजन्सी

दिपावलीच्या सर्वांना मंगलमय शुभेच्छा!

SAMSUNG | V-GUARD | BLUE STAR | Whirlpool | KENSTAR | DHARA | Mycro Fine | KENT HOME | AKAI

USHA | BOSCH | BAJAJ | VOLTAS | MITSUBISHI ELECTRIC | Symphony | Panasonic | PHILIPS | Racold Your comfort your way

0% Finance Available

EYE Q MEDIA -9881098346

सावेडी 2419141 | नवीपेठ 2419142 | मार्केटयार्ड 2419143

प्रशस्त पार्किंग सुविधा | फ्री होम डिलेव्हरी | फ्री डेमोन्स्ट्रेशन | क्रेडिट कार्ड/ डेबिट कार्ड

कापडबाजार, चितळेरोड, सावेडी, माळीवाडा ग्राहकांनी फुलले

नगरच्या बाजारपेठेत दिवाळी खरेदीचा जल्लोष



समाचार/नगर-दि.७

दोन दिवसांपासून दिवाळी सणाच्या उत्सवाला प्रारंभ झाला असून उद्या, रविवारी दिवाळी सणाचा मुख्य दिवस आहे. गेल्या आठवडाभरापासून शहरातील मुख्य बाजारपेठेतसह उपनगरात खरेदीचा अभूतपूर्व उत्साह पाहायला मिळत आहे. गेल्या दोन दिवसांपासून शहरातील प्रमुख रस्ते आणि बाजारपेठ ग्राहकांच्या गर्दीने अक्षरशः ओसंडून वाहत आहेत. कपडे, सोन्या-चांदीचे दागिने, इलेक्ट्रॉनिक्स वस्तू, तसेच गृहसजावटीचे साहित्य आणि आकाशकंदिल खरेदी करण्यासाठी ग्रामीण भागातूनही नागरिक मोठ्या संख्येने शहरात दाखल होत आहेत. यामुळे शहरातील व्यापारी वर्गात आनंदाचे वातावरण असून, बाजारपेठेत कोट्यवधी रुपयांची उलाढाल होत असल्याचे चित्र आहे.दिवाळीच्या पहिल्या आंघोळीसाठी आणि पाडव्यासाठी नवीन कपडे

आकाशकंदिल, पणत्या आणि रांगोळीचे रंगीबेरंगी स्टॉल्स

शहराच्या मुख्य चौकांमध्ये, विशेषतः माळीवाडा आणि जुने बसस्थानक परिसराच्या फूटपाथवर दिवाळीच्या विशेष वस्तूंचे शेकडो स्टॉल्स थाटले आहेत. यंदा बाजारात पर्यावरणपूरक मातीच्या आकर्षक पणत्या, पारंपरिक तसेच आधुनिक पद्धतीचे एलईडी आकाशकंदिल आणि रांगोळीच्या विविध रंगांना मोठी मागणी आहे.

खरेदी करण्याला नागरिक सर्वोच्च प्राधान्य देत आहेत. शहरातील कापड बाजार, चितळे रोड, माळीवाडा, सावेडी परिसर आणि सर्जेपुरा परिसरातील दुकानांमध्ये पाय ठेवायलाही जागा उरलेली नाही. बालगोपाळांचे कपडे, महिलांसाठी

बाजारपेठेत वाहतूक कोंडी

बाजारपेठेत झालेल्या या अलोट गर्दीमुळे शहराच्या अंतर्गत रस्त्यांवर मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी निर्माण होत आहे. माळीवाडा चौक, दिल्ली गेट आणि कापड बाजार भागात वाहनांच्या लांबच लांब रांगा लागत आहेत. ही कोंडी फोडण्यासाठी आणि खरेदीसाठी आलेल्या नागरिकांच्या सुरक्षेसाठी शहर वाहतूक पोलीस आणि स्थानिक पोलिसांनी मुख्य चौकांमध्ये अतिरिक्त पोलीस बंदोबस्त तैनात केला आहे. बाजारपेठेत चोरांचा आणि पाकीटमारांचा सुळसुळाट होऊ नये, म्हणून साध्या वेशातील पोलीसही गस्त घालत आहेत.

साड्या आणि पुरुषांच्या कपड्यांच्या खरेदीसाठी दुकानांमध्ये ग्राहकांच्या रांगा लागल्या आहेत. अनेक नामवंत ब्रँड्स आणि स्थानिक व्यापाऱ्यांनी विविध ऑफर्स आणि सवलती जाहीर केल्यामुळे ग्राहकांचा प्रतिसाद अधिकच वाढला आहे. दिवाळी मुहूर्तावर सोने खरेदी करणे अत्यंत शुभ मानले जात असल्याने, शहरातील सराफ बाजारात ग्राहकांची मोठी वर्दळ सुरू झाली आहे. सोन्याचे दर चढे असले, तरी सुवर्णालंकार आणि चांदीची नाणी खरेदी करण्यासाठी नागरिक उत्सुक दिसत आहेत.

॥ श्री ॥

दिवाळी फराळ

५१ वर्षांची परंपरा जपत शुद्ध, पौष्टिक, पारंपारिक व घरगुती पद्धतीने बनविलेले फराळाचे पदार्थ..

सच्चिदानंद केटरर्स्

प्रोप्रा. नरेंद्र कुलकर्णी

9822771199, 9420796195

शमी गणपती मंगल कार्यालय, दिल्लीगेट, अ.नगर

TVS



यंदाच्या दिवाळीला घरी घेवून या



TVS गाडी खरेदीवर

डबल आनंद

गाडीवर सायकल

चक्कफ्री

₹13000/-* किंमतीची सायकल फ्री मिळवा



ऑफर 10 नोव्हेंबर 2026 पर्यंत

सदर ऑफर टिव्हिएस अपाचे, रेडऑन,रायडर व स्पोर्टस् खरेदीवर लागू.

On Road Price	1,30,358/-
Cycle Price + TVS Credit Dis. (13000+3000)	16,000/-
Effective Price	1,14,358/-



On Road Price	84,338/-
Cycle Price + TVS Credit Dis. (13000+6500)	19,500/-
Effective Price	64,838/-



On Road Price	91,893/-
Cycle Price + TVS Credit Dis. (13000+6500)	19,500/-
Effective Price	72,393/-



On Road Price	1,05,113/-
Cycle Price + TVS Credit Dis. (13000+3000)	16,000/-
Effective Price	89,113/-

TVSCREDIT ₹6500/- विशेष डिस्काऊंट ऑफर रेडऑन व स्पोर्टस् खरेदीवर लागू

TVSCREDIT ₹3000/- विशेष डिस्काऊंट ऑफर कोणत्याही गाडी खरेदीवर लागू

कमी डाऊनपेमेंट ₹4,999/- कमी व्याजदर 6.99% ऑफर स्पोर्टस् आणि रेडऑनवर लागू

IDFC FIRST Bank | SHRIRAM City | AU SMALL FINANCE BANK

प्रत्येक बुकिंगवर आकर्षक भेटवस्तु

कमी डाऊनपेमेंट ₹7,999/- कमी व्याजदर 6.99% ऑफर अपाचे व रोनिनवर लागू

L&T Financial Services फायनान्स अंतर्गत 100% पर्यंत कर्जसुविधा उपलब्ध

Jupiter 125 कमी डाऊनपेमेंट ₹4,999/- NO COST EMI सुविधा उपलब्ध

Flipkart Offers Available CSD Facility Available

कमी डाऊनपेमेंट ₹6,999/- कमी व्याजदर 6.99% ऑफर टिव्हिएस रायडर खरेदीवर लागू

IDFC FIRST Bank | SHRIRAM City | AU SMALL FINANCE BANK

Conditions Apply*

सेवा तत्परतेची, परंपरा विश्वसनीयतेची..

Financial Partners : TVSCREDIT | L&T Financial Services | HDFC BANK | IDFC FIRST Bank | SHRIRAM City | AU SMALL FINANCE BANK

भनसाळी TVS

सक्कर चौक, अहिल्यानगर 7057817817 / 8087917817

बेलापूर रोड, श्रीरामपूर 9763817817 / 9067817817

अधिकृत सबडिलर ✲ गणराज ऑटो, लोणी मोबा. : ७०२०६६३५७४ ✲ श्री साईराज ऑटो, कोल्हार मोबा. : ९९६०५९८९५९ ✲ राका मोटर्स, राहुरी मोबा. : ८०८७२०१००७ ✲ विरा टिव्हिएस, देवळालीप्रवरा मोबा. : ९६६५८६७०६७ ✲ गणराज ऑटो, राहुरी फॅक्टरी मोबा. : ७४९८१५५८८७० ✲ तुवर मोटर्स, मांजरी मोबा. : ९६२३४३४६३० ✲ जगताप ऑटो, नेवासा मोबा. : ७५१७८८६०७८ ✲ श्री ऑटो, सोनई मोबा. : ९८५०१४९००७ ✲ श्री स्वामी समर्थ सर्व्हिस, वांबोरी मोबा. : ९४२०६३१९१९ ✲ ढोले मोटर्स, तिसगांव मोबा. : ७५०१०१६००६ ✲ संदिप ऑटो, सुपा मोबा. : ७०२०९५३६०५ ✲ सावळेश्वर ऑटो, जामखेड मोबा. : ८६००८१३६३६ ✲ श्रुती टिव्हिएस, पारनेर मोबा. : ९९६०९२०८१८ ✲ शिवराजे टिव्हिएस, राहुरी मोबा. : ८१४९९८८७८४ ✲ महाकाल टिव्हिएस, भोकर मोबा. : ९०२१५१२०२५ ✲ शुभम ऑटो, पाथर्डी मोबा. : ९७६३२७३२२८ ✲ जगदंबा ऑटोमोबाईल्स, कुकाणा मोबा. : ७०५७२५२११४ ✲ जय भवानी टिव्हिएस, कुकाणा मोबा. : ७५२२९९९२९६ ✲ वैष्णवी ऑटो, टाकळीभान मोबा. : ९१४६८१७८१७

दिवाळी शुभचिंतन समाचार



दिवाळी साहित्य मैफल २०२६

विशेष वाचनीय लेख

-: मान्यवर लेखक : -

- अरूण नलावडे
- प्रार्थना बेहरे
- शरद पोंक्षे
- प्रवीण दवणे
- मीना बोकील
- प्रवीण ठिपसे
- आदित्य दवणे



समाचार

सुटीची सूचना

'समाचार' कार्यालयाला उद्या रविवार दि. ०८ नोव्हेंबर २०२६ ते गुरुवार दि. १२ नोव्हेंबर २०२६ **'समाचार'** कार्यालयास दीपावलीची सुटी असल्यामुळे दि. १२ नोव्हेंबर २०२६ पर्यंत अंक प्रकाशित होणार नाही. दि. १३ नोव्हेंबर (शुक्रवार) नियमित अंक प्रकाशित होईल. याची **'समाचार'**चे वाचक, जाहिरातदार, विक्रेते यांनी नोंद घ्यावी.

सर्वांना दीपावलीच्या शुभेच्छा.... आजच्या अंकाबरोबर दिवाळी विशेष पुरवणी **'मैफल'** देत आहोत.

- संपादक

आरटीओ मधील कारभारावर
वंचित बहुजन आघाडीचा आक्षेप

समाचार/नगर-दि.७



अहिल्यानगर प्रादेशिक परिवहन कार्यालयात सुरू असलेला अनागोंदी कारभार, अनधिकृत एजेंटशाही, चेक पॉईंटवरील बेकायदेशीर वसुली आणि रस्त्यावरील धोकादायक जुगाडू' व ओव्हरलोड ऊस वाहतुकीविरोधात वंचित बहुजन आघाडीच्या वतीने प्रादेशिक परिवहन अधिकारी सगरे यांना निवेदन देण्यात आले.

वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष योगेश साठे, वाहतूक विभागाचे मनोज साळवे, युवा शहराध्यक्ष ॲड. योगेश गुंजाळ, गौतम निळ, मनोज साळवे, पप्पू चव्हाण, संदीप साळवे, सुरेश पानपाटील आधीसह पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

निवेदनात म्हटले आहे की, आरटीओ कार्यालयात कामासाठी येणाऱ्या नागरिकांना थेट सेवा मिळण्याऐवजी अनधिकृत मध्यस्थ व दलालांच्या माध्यमातून जाण्याची सक्ती केली जात असून, यामुळे सर्वसामान्यांची आर्थिक पिळवणूक होत आहे तसेच शासनाचे परिपत्रक असतानाही अधिकारी व कर्मचारी मुख्यालयात वेळेवर उपस्थित राहत नसल्याने नागरिकांना ताटकळत राहावे लागते. तसेच रस्ते तपासणी पथकांकडून चेकिंगच्या नावाखाली चेक पॉईंट्सवर वाहने अडवून बेकायदेशीररीत्या रोख वसुली केली जात असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. जिल्ह्यात कोणतीही सुरक्षा मानके न पाळता आणि अधिकृत पासिंग किंवा आरटीओ मान्यता नसताना सर्रास चालणारी बेकायदेशीर जुगाडू' आणि क्षमतेपेक्षा जास्त (ओव्हरलोड) ऊस वाहतूक अत्यंत चिंताजनक बनली आहे. यामुळे गंभीर अपघात होऊन निष्पाप नागरिकांचा जीव धोक्यात येत असूनही आरटीओ प्रशासनाकडून याकडे दुर्लक्ष केले जात आहे, असे निवेदनात म्हटले आहे.

प्रशासनाने या मागण्यांवर गांभीर्याने विचार करून कायदेशीर सुधारणात्मक पावले न उचलल्यास, वंचित बहुजन आघाडीतर्फे लोकशाही व सनदशीर मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही या निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.

निमगाव वाघात फटाकेमुक्त दिवाळीची शपथ

समाचार/नगर-दि.७

फटाक्यांचा धूर, ध्वनिप्रदूषण आणि पर्यावरणाची हानी टाळून निसर्गपूरक दिवाळी साजरी करण्याचा संदेश देत निमगाव वाघा (ता. नगर) येथे फटाकेमुक्त दिवाळी साजरी करण्याची सामूहिक शपथ घेण्यात आली. शहीद जवान गोरख नाना जाधव यांच्या स्मारकस्थळी हा पर्यावरण संवर्धनाचा उपक्रम उत्साहात पार पडला.

स्व. पै. किसनराव डोंगरे बहुउद्देशीय संस्था, श्री नवनाथ युवा मंडळ, धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालय आणि पै. नाना डोंगरे व्यायामशाळा यांच्या संयुक्त विद्यमाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ग्रामस्थ, युवक-युवती आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी एकत्र येत फटाकेमुक्त व पर्यावरणपूरक दिवाळी साजरी करण्याचा संकल्प केला.

संस्थेचे अध्यक्ष पै. नाना डोंगरे यांनी उपस्थित ग्रामस्थांना फटाके मुक्तीची शपथ दिली. फटाक्यांमुळे होणारे वायुप्रदूषण, ध्वनिप्रदूषण, लहान मुले, ज्येष्ठ नागरिक तसेच पशुपक्ष्यांना होणारा त्रास टाळण्यासाठी प्रत्येकाने जबाबदारीने दिवाळी साजरी करावी, असे आवाहन करण्यात आले. पर्यावरणाचे रक्षण ही केवळ शासनाची किंवा एखाद्या संस्थेची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे, हा संदेश यावेळी देण्यात आला.

यावेळी भाऊसाहेब जाधव, बापू सुंबे, पोपट भगत, रमेश कुलट, राजू डोंगरे, बाळू जाधव, उत्तम निमसे, नवनाथ जाधव, भागचंद जाधव उपस्थित होते.



गुरुवाणी १०४
तीर्थंकर पुण्य ग्रहण करा

कोणी कोणाला आपले सुख दुःख, ज्ञान, चरित्र देऊ शकत नाही. आजचा अध्याय जगातील अलौकिक साधनेची चर्चा आहे. कोणी मला आनंद देऊ शकत नाही पण मी आनंद घेऊ शकतो. यासाठी जे माध्यम असते त्याला लेश्या म्हणतात. चंडकौशिककडे तीर्थंकर महावीर पोहोचले. चंडकौशिकने जन्मोजन्मीचे अपमान, दुःख पकडून ठेवले होते. माझे कोणीच मित्र होऊ शकत नाही अशी त्याची धारणा बनली होती. त्याच्यात अनेक जन्मांचे विष तयार झाले होते. त्याच्या नुसत्या नजरेने जीव मरण पावायचा. कारण त्याच्या विषयी प्रत्येकाच्या मनात भय होते. चंडकौशिक आपल्याला मारणारच अशी मानसिकता होती. जशी आपली मानसिकता असते तसेच आपल्या जीवनात होत राहते. आपण नकारात्मक मानसिकतेचे दरवाजे उघडे ठेवतो. पण तीर्थंकर महावीरांनी चंडकौशिकच्या विषासाठीआपले दरवाजे बंद केले. मन, वचन, काया गुप्ति केली. कोणाचेही पाप, राग, विष या लेश्या ग्रहण न करण्याचा निश्चय म्हणजे गुप्ति किंवा संवर् असते. तीर्थंकरांनी आधी चंडकौशिकचे सगळे विष बाहेर पडू दिले. त्याचा कोणताही परिणाम तीर्थंकरांवर झाला नाही. हे पाहून चंडकौशिकही जागेवर थिजून गेला. त्याचा आतील दरवाजा खुला झाला आणि तीर्थंकरांच्या वात्सल्याचे अमृत त्याला प्राप्त झाले व चंडकौशिक आमूलाग्र बदलला. एखादी वस्तू कोणी दिली तरच ग्रहण केली जाऊ शकते. पण समोरच्याने दिली नाही तरी लेश्या ग्रहण केली जाऊ शकते. कोणाची लेश्या ग्रहण करायची हे ठरवायचे असते. सूर्य प्रकाश सगळ्यांसाठी समान आहे. तरीही प्रत्येक फुल वेगवेगळ्या रंगाचे असते. यामागे सायन्स आहे. फुलांमध्ये एक सिस्टीम असते, सूर्य प्रकाशापासून कोणती ऊर्जा ग्रहण करायची. जो रंग ग्रहण करायचा प्रोग्राम आहे, तोच रंग फक्त ग्रहण केला जातो, इतर सर्व रंग सोडून दिले जातात. सुधर्मा स्वामींनी परमात्म्याला ग्रहण केले. अर्जुन द्रोणाचार्यांचा शिष्य होता तर एकलव्य द्रोणाचार्यांचा भक्त होता. शिष्य गुरू जितके देईल तितकेच आत्मसात करतो. भक्त गुरूंकडील सगळेच घेतो. घेण्याचे सामर्थ्य आणि देण्याची कला ही जिन शासनाची अनोखी लेश्या आहे. आपण आपली श्रद्धा कोणाला देऊ शकत नाही. पण आपण लेश्या देऊ शकतो आणि घेऊही शकतो. जे आपण ग्रहण करू त्याचा परिणाम होतोच. जे ग्रहण करणार नाही त्याचा परिणाम होत नाही. म्हणूनच दिवाळीच्या पूजेवेळी चक्रवर्तीचे पुण्य ग्रहण करा, तीर्थंकर भगवान महावीरांचे पुण्य ग्रहण करा, इंद्रभूती गौतम, सुधर्मा स्वामींची भक्ती ग्रहण करा, विश्वातील स्वस्तिक ग्रहण करा.

उपाध्याय प्रवर
पू.श्री.प्रवीणऋषिजी म.सा.

पर्यावरण संवर्धन विषयावर बैठक
वृक्षतोडीमुळे पर्यावरणाची मोठी हानी - पोपटराव पवार

समाचार/नगर-दि.७



भारताची मूळ परंपरा निसर्गाशी जोडलेली आहे. मात्र, पर्यावरणाचा कोणताही विचार न करता ओढे-नाले यांमध्ये अतिक्रमणे, नद्यांच्या पूररेषेचे उल्लंघन करून बांधकामे आणि विकासाच्या नावाखाली मोठ्या प्रमाणात वृक्षतोड व जंगलतोड सुरू आहे. त्यामुळे आपल्या देशाचे टाऊन प्लॅनिंग पूर्णपणे कोलमडले आहे, असे प्रतिपादन पद्मश्री पोपटराव पवार यांनी केले.

उपमहापौर ॲड. धनंजय जाधव यांच्या संकल्पनेतून सुरू करण्यात आलेल्या पालकमंत्री ग्रीन सिटी मोहिमेअंतर्गत साई द्वारका सेवा ट्रस्ट व अहिल्यानगर महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने पर्यावरण संवर्धनाच्या विषयावर आयोजित बैठकीत ते मार्गदर्शन करत होते. यावेळी उपमहापौर ॲड. धनंजय जाधव, संजय गुगळे, कैलास दिघे, हर्षल आगळे, राजेंद्र पवार, प्रताप काळे, अमोल बागुल, राहुल मुथा आदी उपस्थित होते.


पद्मश्री पोपटराव पवार म्हणाले की, पालकमंत्री ग्रीन सिटी मोहिमेअंतर्गत उपमहापौर ड. धनंजय जाधव यांच्या पुढाकारातून शहरात आतापर्यंत १५ हजार वृक्षांची लागवड करण्यात आली आहे. मात्र, केवळ वृक्षलागवड करून चालणार नाही, तर दुष्काळ आणि पाणीटंचाईच्या काळात लावलेली झाडे कशी जगवायची, याचे योग्य नियोजन करणेही तितकेच महत्त्वाचे आहे. प्रत्येकाने लावलेले झाड जतन करून त्याला मुलाप्रमाणे सांभाळले पाहिजे. हेच आपल्या पुढील पिढीचे खरे भविष्य आहे.

पोपटराव पवार यांनी सातबारा संकल्पनेचा संदर्भ देत वृक्षांचे महत्त्व विशद केले.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या नावाने आपल्या अहिल्यानगर शहराची ओळख आहे. त्यामुळे त्यांना अभिप्रेत असलेले पर्यावरणसंतुलित आणि पाणीदार शहर घडविण्यासाठी ड. धनंजय जाधव यांनी हाती घेतलेल्या पालकमंत्री ग्रीन सिटी मोहिमेत सर्वांनी सहभागी व्हावे. साईबाबांची प्रेरणा समस्त मानवजातीच्या कल्याणासाठी आहे. त्याच भावनेतून साई द्वारका सेवा ट्रस्टचा हा उपक्रम पुढील पिढीच्या भविष्यासाठी उपयुक्त ठरणार आहे, असे त्यांनी सांगितले.

यावेळी उपमहापौर ॲड. धनंजय जाधव म्हणाले की, पालकमंत्री ग्रीन सिटी मोहिमेअंतर्गत शहरात आतापर्यंत १५ हजार वृक्षांची लागवड करण्यात आली आहे. दुष्काळाच्या काळात या वृक्षांचे संगोपन व्हावे, यासाठी पाण्याचे नियोजन आणि पर्यावरण संवर्धन या विषयांवर पद्मश्री पोपटराव पवार यांनी मोलाचे मार्गदर्शन केले.


शब्दकोडे-१०१



आडवे शब्द
१) देऊळ
४) गावठी
७) साखरेचा पाक अधिक आवळा यांचा पौष्टिक पदार्थ
९) गावजेवण
११) डुक्कर
१३) चुलता
१४) हस्त
१५) विश्रांती
१६) औदार्य
१८) सोमवल्ली पासून तयार केलेली दारु
१९) ज्वारीची वाळलेली खुंट, गुरांचे एक खाद्य
२०) खवा, एक दुग्धजन्य पदार्थ
२१) नमुना, चुणूक
२३) नवरा
२५) प्रत्येक, महादेव
२७) बैलाच्या गळ्यात बांधण्याचा दोर
२८) नको असलेला
२९) छोटा
३०) रमापती
३२) समतल
३५) खरबरीत, झोंबणारे
३७) बारीकसारीक
४०) विड्याच्या पानाची वल्लरी
४१) गावातील जुनी वस्ती
४३) उपयोग
४४) मिठी
४६) रडणारा
५०) आजूबाजूला
५१) पत्रातील थोडक्यात साष्टांग नमस्कार
५३) अभिप्राय
५४) सोनचाफा
५७) वागण्याची पद्धत
५९) कलंकाचा ठिपका
६०) चांदी
६२) कागदाचा ओला गोळा
६३) एक पालेभाजी, सांभाळणारा
६४) मनाची घालमेल.

उभे शब्द
१) सं. तुकारामांचे गाव
२) मोठया आवाजात पुकारणे
३) कुबेराचा सेवक
४) एक रंगीत कंदमूळ
५) अरण्य
६) पतीपत्नी
७) आसक्ती
८) वस्त्र, कापड
१०) छिद्र
१२) सीतापती
१३) कार्य, काज
१५) विहीर
१६) जंगलात लागलेली आग
१७) सर्वस्व
१८) उदाहरणासह
१९) विद्या, शास्त्र
२०) आईचा भाऊ
२१) महिना
२२) गणितातील मध्यम प्रमाण
२४) ज्या प्रमाणे
२६) लक्ष्मीचे एक नाव
२७) संध्याकाळ
२८) अभिनेता
३१) सोने
३३) पाप
३४) चणचण
३६) अस्थिर, हलणारी (संपत्ती)
३७) धूर्त, फसविणारा, लुच्च
३८) बेचव, पचपचीत
३९) पराजय
४०) एक चतुर्थांश भाग
४२) पातळसर
४४) टाळ्यांचा प्रचंड आवाज
४५) कापडी बैठक
४७) बांगड्यांचा व्यवसाय करणारा
४८) वार्ताहर
४९) कावळा
५०) पाणी (सं)
५२) जुनेच्या विरुद्ध
५५) पर्वत
५६) अस्थिर मनाचा
५८) अखंड
६१) वजनदार

शब्दकोडे-१०० चे उत्तर



उ	प	न	य	न	■	अ	ल	ग	■	सो	■	ठा	ण	
प	र	बा	■	य	था	र्थ	■	ड	ग	म	ग	णे	■	
का	■	ग	ग	न	■	ही	न	गं	ड	■	बा	क	डा	
र	ज	त	■	बा	स	न	■	ज	ग	■	क्ष	र	■	
■	न	■	क	ण	■	■	प	■	ने	म	■	■	क	
म	क	रं	द	■	पा	च	र	■	र	हा	ट	■	ळ	
■	ज	ग	र	हा	टी	■	बा	म	■	ज	प	त	प	
म	न	■	दा	■	ल	हा	न	स	हा	न	■	क	■	
ध	नी	■	न	ग	■	रा	गी	■	ट	■	श	त	क	
मा	■	का	■	ज	स्त	■	■	स	क	ट	नि	क	ट	
शी	त	ल	ता	■	ब	न	च	र	■	पा	बा	■	■	
■	ल	■	व	प	न	■	क	■	क	ल	र	■	पा	
ह	बा	ल	दा	र	■	रा	म	र	स	■	■	क	प	
वा	र	■	न	त	म	स्त	क	■	र	ज	त	व	णी	

आपले भविष्य

दि. ८/११/२०२६ ते १४/११/२०२६

शिरीष कुलकर्णी
मो.नं.८७८८२६६६९०

मेष: **प्रसंगातून कर्तव्याची प्रेरणा लाभेल.**
लक्ष्मी पूजन श्रद्धापूर्वक पार पडेल. भावूक प्रसंगातून कर्तव्याची प्रेरणा बळकट होईल. कौटुंबिक अपेक्षा पूर्ण होण्यात अडथळे येतील. कुटुंबातील विशिष्ट घडामोडी तुमचे मानसिक दडपण वाढविणाऱ्या ठरतील. शनी भ्रमण प्रतिकूल परिस्थितीतून योग्य मार्ग आणि योग्य भूमिका निवडायला मदत करेल. मंगळ भ्रमण आग्रही वृत्ती वाढवेल. स्वतःच्या रागावर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे.

वृषभ: **निर्णयात उतावळेपणा राहील.**
आरोग्य सांभाळलेत तर एकाच वेळी अनेक आघाड्यांवर सक्षमतेने काम कराल. दिवाळी मन अस्वस्थ राहील. लक्ष्मी पूजन यथासांग पार पाडाल. राशीतील हर्षल आणि चतुर्थ स्थानात येणारा मंगळ तुमच्या निर्णयातील उतावळेपणाचे निदर्शक आहेत. विशेषतः कौटुंबिक निर्णय पूर्ण विचारांती आणि कोणालाही न दुखावता घेणे आवश्यक आहे.

मिथुन: **नातेवाईकांकडून मनःस्ताप**
दिवाळीला साहित्य आणि कला यांचा आनंद घ्याल. आनंदाने आणि उत्साहाने लक्ष्मी पूजन साजरे कराल. शेअर बाजारात अपेक्षाभंग होण्याची शक्यता आहे. अनपेक्षित घटना चिंता वर्धक ठरतील. दैनंदिन समस्या हाताळताना नोकरदारांची शक्ती खर्च होईल. तृतीय स्थानात येणारा मंगळ वेगवान निर्णय घेणारा राहील. नातेवाईकांकडून मनःस्ताप संभवतो.

कर्क: **पती पत्नीतील गैरसमज टाळा..**
मित्र मंडळींसमवेत स्नेहभोजनाचे योग येतील. दिवाळीतील लक्ष्मी पूजन उत्साहाने साजरे होईल. घरातील जेष्ठ व्यक्तींच्या आरोग्याची मात्र काळजी घ्यावी लागेल. नोकरदारांना प्रगतीबाबत तडजोड स्वीकारावी लागेल. बारा तारखेला मंगळाचा होणारा राशीबदल आर्थिक घडामोडींबाबत काटेकोर रहाण्याचे संकेत देणारा आहे. सप्ताहाच्या शेवटी पती पत्नीतील गैरसमज कटाक्षाने टाळा.

सिंह: **उद्योगात मोठे कर्तृत्व घडेल..**
लक्ष्मी पूजन धामधुमीत आणि श्रद्धेने पार पडेल. स्वतःच्या मोठेपणाचे शक्य तितके प्रदर्शन करण्याची संधी घ्याल. नोकरी किंवा उद्योग मोठ्या कर्तृत्वाचे असतील. सामाजिक मान आणि प्रतिष्ठा वृद्धिंगत होतील. हलगर्जीपणामुळे स्वतःच्या आरोग्यावर अधिक ताण निर्माण होण्याची शक्यता आहे. तुमच्या राशीत प्रवेश करणारा मंगळ स्वभावाला अहंकाराचे कंगोरे निर्माण करेल. सप्ताहांती मोठे कौटुंबिक खर्च होतील.

कन्या : **उपक्रमांना आप्तेष्टांची साथ लाभेल.**
लक्ष्मी पूजन भक्तिभावाने आणि यथोचित पूजेने साजरे कराल. सणाच्या निमित्ताने कौटुंबिक गैरसमज टाळायचा प्रयत्न करा. कौटुंबिक उपक्रमांना आप्तेष्टांची अपेक्षित साथ लाभेल. तुमच्या राशीच्या व्यय स्थानात प्रवेश करणारा मंगळ भविष्यातील निर्णयाबाबत उतावळेपणा दर्शविणारा आहे. कौटुंबिक आणि आर्थिक चिंता वाढतील. अती स्पष्टोक्तीने जवळच्या नात्यातील अंतर वाढेल.

तूळ: **मित्र मैत्रिणींच्या भेटीगाठीने सुखावाल.**
मनावर व्यर्थ अनिश्चिततेचे दडपण घेऊन दैनंदिन उपक्रम पार पाडाल. नोकरीत निर्विवादपणे तुमचे वर्चस्व राहील. बारा तारखेला होणारा मंगळाचा राशीबदल यश देणारा, मान सन्मान देणारा आणि प्रगती साधणारा ठरेल. उत्तरार्धात मित्र मैत्रिणींच्या भेटीगाठीने सुखावाल. सप्ताहांती गुरु, मंगळ आणि शनी अशा तीनही ग्रहांच्या लाभ दायक भ्रमणातून परिस्थिती झळाळेल.

वृश्चिक: **सप्ताहांती कामाचे ताण वाढतील.**
कौटुंबिक खरेदी आनंददाई राहील. व्यर्थ खर्चातून धननाश टाळा. लक्ष्मीपूजन घरगुती स्वरुपात साजरे कराल. अधीरता आणि वाढती धरसोडवृत्ती यामुळे व्यावसायिक कामे अर्धवट राहण्याची शक्यता आहे. मुलामुलींचे उपक्रम, त्यांच्या भावना आणि त्यांचे आरोग्य याकडे विशेष लक्ष पुरवावे लागेल. सप्ताहांती नोकरदारांच्या कामाचे ताण वाढतील.

धनु: **नोकरीत वरिष्ठांच्या अपेक्षा वाढत राहतील.**
आनंद प्रसंग,आणि अनुकूल घटना उत्साहाला उधाण आणतील. अमावस्या आर्थिक प्रगतीतून भाग्याची ठरेल. लक्ष्मी पूजनाला लक्ष्मीचा मंगल आशीर्वाद लाभेल. घरातील जेष्ठांच्या सेवेने त्यांचा आशीर्वाद मिळावा. नात्यातील ओलावा जपाल तर आनंद द्विगुणीत होईल. मंगळाचा राशीबदल आरोग्यात सुधारणा करेल परंतु नोकरीत वरिष्ठांच्या अपेक्षा वाढत राहतील.

मकर: **कष्टाला मान सन्मानाचे वलय लाभेल.**
लक्ष्मी पूजन प्रतिष्ठेच्या प्रदर्शनात परंतु भक्तिभावाने पार पडेल. अमावस्या पद आणि अधिकार प्राप्तीतून भाग्यकारक ठरेल. कौतुकास्पद चिकाटी आणि कष्टाला मान सन्मानाचे वलय लाभेल. बारा तारखेचा मंगळाचा राशीबदल आरोग्याच्या सतर्केचा इशारा देणारा आहे. जेष्ठांनी विशेष काळजी घ्यावी. सप्ताहांती मानसिक स्थिती दोलायमान राहील.

कुंभ: **स्नेहभोजनाचा आनंद लाभेल.**
सप्ताहाप्रारंभी दिवाळीच्या मौजमजेचा आनंद घ्याल. गुरु भ्रमणाच्या अनुकुलतेतून लक्ष्मीचे मंगल आशीर्वाद लाभतील. शनी अपेक्षित आर्थिक घडामोडीतून नवी उमेद. राशीबदलातून सप्तमात येणारा मंगळ संसारातील समजुतदारपणाचे महत्व अधोरेखित करेल. सप्ताहाच्या शेवट स्नेहभोजनाचा आनंद देणारा आणि सगे सोयऱ्यांच्या भेटीचा आहे.

मीन: **नवी शारीरिक ताकद लाभेल.**
दिवाळीत लक्ष्मीचे पूजन तुम्ही आत्यंतिक श्रद्धेने पार पाडाल. राशीतील वक्री शनी आणि षष्ठातील गुरु व्यावसायिक आघाड्यांवर कोंडी करायचा प्रयत्न करतील. परंतु राशी संक्रमणातून मंगळ तुम्हाला नवी शारीरिक आणि मानसिक ताकद देईल. सप्ताहाच्या शेवटी हितचिंतक आणि सहकारी यांच्याशी असणारे मैत्रीपूर्ण संबंध उपयोगी पडतील.

चौंडीत दोन्ही नेत्यांची बंद दाराआड चर्चा

जिल्हा बँकेत शिंदे-विखे एकत्रित काम करणार!

समाचार/नगर-दि.०७

जिल्हा सहकारी बँकेची निवडणूक एकमेकांच्या विरोधात लढल्यानंतर पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी काल विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांची चौंडी गावी भेट घेऊन बंद दाराआड चर्चा केली. पालकमंत्र्यांनी या भेटीवर बोलताना निवडणूक झाली, जिल्हा बँकेचा विषय संपला, अशी सूचक प्रतिक्रिया देत यंदा दुष्काळी परिस्थिती गंभीर असल्याने त्या विषयावर सभापतींशी चर्चा झाल्याचे म्हटले आहे. दरम्यान शिंदे – विखे यांच्या या भेटीने हे दोन्ही नेते जिल्हा बँकेत एकत्रित काम करतील, अशी शक्यता वर्तविली जात आहे.

विधानपरिषदेचे सभापती प्रा. शिंदे आणि पालकमंत्री विखे पाटील हे दोन्ही भाजपाचे ज्येष्ठ नेते आहेत. जिल्हा बँकेच्या निवडणुकीत मात्र ते एकमेकांच्या विरोधात लढले. या निवडणुकीत मंत्री विखे पाटील आणि माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या आघाडीने सभापती शिंदे यांच्या गटाची जामखेड सोसायटी मतदारसंघाची जागा बिनविरोध केली. मात्र चार जागांसाठी आग्रही असलेल्या प्रा. शिंदे यांचे त्यावर समाधान झाले नाही. त्यांच्या गटाचे ३ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उतरले. त्यातील कर्जत सोसायटी मतदारसंघाची जागा प्रा. शिंदे यांच्या गटाने जिंकली. २१ संचालक असलेल्या जिल्हा बँकेत विखे – थोरात आघाडीचे १८ तर प्रा. शिंदे गटाचे २ संचालक निवडून आले आहेत. नगर दक्षिणेचे शरद पवार राष्ट्रवादीचे खा. नीलेश लंके यांनी विखे – थोरात आघाडीविरुद्ध विरोधकांचे पॅनल करून लढताना पारनेर सोसायटी मतदारसंघाची जागा जिंकली.

आता जिल्हा बँकेचे नवे पदाधिकारी निवडीसाठी येत्या गुरुवारी बँकेच्या संचालकांची बैठक बोलवण्यात आली आहे. सत्ताधारी विखे – थोरात आघाडीत बँकेचे अध्यक्षपद भाजपाकडे तर उपाध्यक्षपद काँग्रेसकडे जाणार हे जवळपास निश्चित आहे. अध्यक्षपदासाठी भाजपाकडून माजी खा. सुजय विखे आणि शेवगाव – पाथर्डीच्या आ. मोनिका राजळे यांची नावे आघाडीवर आहेत. उपाध्यक्षपदी माजी मंत्री थोरात यांचे जावई रणजीत देशमुख यांचे नाव निश्चित मानले जाते. मात्र बँकेच्या नव्या पदाधिकाऱ्यांची नावे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस निश्चित करणार असल्याने भाजपाकडून कुणाच्या नावाला हिरवा कंदील दिला जातो याकडे जिल्ह्याचे लक्ष लागले आहे. या सर्व पार्श्वभूमीवर पालकमंत्री विखे पाटील यांनी काल जामखेड तालुक्यातील चौंडी येथे जात विधानपरिषदेचे सभापती प्रा. शिंदे यांची भेट घेऊन बंद दाराआड चर्चा केली. तब्बल दीड तास झालेल्या या चर्चेचा



तपशील समजला नसला तरी यापुढील काळात जिल्हा बँकेत एकत्रित काम करण्याबरोबरच जिल्हा बँक पदाधिकारी निवडीवर दोन्ही नेत्यांमध्ये चर्चा झाली असण्याची शक्यता आहे. या भेटीनंतर पालकमंत्री विखे पाटील यांनी 'निवडणूक झाली, जिल्हा बँकेचा विषय संपला', असे सूचक वक्तव्य करीत यापुढे एकत्रित राहण्याचे संकेत दिले आहेत. सभापती प्रा. शिंदे यांनीही सहकार वेगळे आणि राजकारण वेगळे असे सांगत आम्ही दोघे एकच पक्षाचे असल्याने भविष्यात राजकारणात एकत्रितच राहणार असल्याचे स्पष्ट केले आहे.

'बिन रंगाची गोष्ट' एकांकीकेतील कलाकारांचा सत्कार

सारडा महाविद्यालयात सर्वांगीण प्रगतीसाठी योग्य मार्गदर्शन-कोठारी

समाचार/नगर-दि.०७



सारडा महाविद्यालयात केवळ पुस्तकी ज्ञान न देता विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी कला, क्रीडा, नाट्य आशा सर्व क्षेत्रांमधील यशासाठी योग्य मार्गदर्शन केले जात आहे. त्यामुळे महाविद्यालयातील विद्यार्थी विविध स्पर्धांमध्ये यशाचा डंका पेटवत आहेत. यामुळे महाविद्यालयाचे नावलौकिक वाढत आहे, असे प्रतिपादन हिंद सेवा मंडळाचे सचिव सुमतीलाल कोठारी यांनी केले.

नुकत्याच अखिल भारतीय मराठी नाट्यपरिषदेच्या वतीने घेण्यात आलेल्या नाट्यपरिषद करंडक एकांकिका स्पर्धेच्या अंतिम फेरीत पेमराज सारडा महाविद्यालयाच्या बिन रंगाची गोष्ट या एकांकिकेने सांघिक तृतीय पारितोषिकासह वैयक्तिक ५ पारितोषिके पटकावली. या यशाबद्दल सारडा महाविद्यालयात आयोजित कौतुक सोहळ्यात एकांकिकेत सहभागही सर्व कलाकारांचा सत्कार संस्थेचे सचिव सुमतीलाल कोठारी व महाविद्यालयाचे चेअरमन मधुसूदन सारडा यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ज्येष्ठ मार्गदर्शक अजित बोरा, संचालिका प्रा.ज्योती कुलकर्णी, डॉ.पारस कोठारी, महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ.माहेश्वरी गावित, नाटकाचे मार्गदर्शक प्रा.प्रसाद बेडेकर, मध्यवर्ती नाट्य परिषदेचे कोशाध्यक्ष सतीश लोटके यांच्यासह सर्व कलाकार उपस्थित होते.

यावेळी मधुसूदन सारडा यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करून शुभेच्छा दिल्या. बिन रंगाची गोष्ट या एकांकिकेमध्ये पाण्याच्या गंभीर प्रश्नावर प्रकाश टाकण्यात आला आहे. महाविद्यालयाची माजी विद्यार्थिनी गौरी डांगे हिने ही एकांकिका लिहिलेली असून, याचं दिग्दर्शन महाविद्यालयाचा विद्यार्थी निरंजन केसकर यानी केले आहे. या नाटकाची मूळ संकल्पना अमोल साळवे याची आहे. या विद्यार्थ्यांना नाट्य परिषद उपनगर शाखेचे अध्यक्ष आणि महाविद्यालयातील शिक्षक प्रा. प्रसाद बेडेकर यांचे मार्गदर्शन मिळते आहे. मुबई येथे झालेल्या महाअंतिम फेरीत या एकांकीने सांघिक तृतीय परितोषिक (रोख ५० हजार रोख), नेपथ्यचे तृतीय पारितोषिक, लक्षवेधी अभिनेता यशवंत दुसुंगे, लक्षवेधी अभिनेत्री मृण्मयी ठोंबे, दिग्दर्शन तृतीय निरंजन केसकर आसे विविध पारितोषिके मिळवली आहेत.

सहकारामुळे संगमनेर तालुक्यात आर्थिक समृद्धी - थोरात

समाचार/नगर-दि.०७

सहकार चळवळीने ग्रामीण भागातील अर्थव्यवस्थेला बळ देण्याचे महत्त्वपूर्ण काम केले आहे. संगमनेर तालुक्यात पतसंस्था आणि दूध संस्थांची एकमेकांना पूरक अशी व्यवस्था निर्माण झाल्याने सहकाराची भक्कम चळवळ उभी राहिली आहे. आज तालुक्यात १३४ पतसंस्था असून, त्यांच्याकडे सुमारे २ हजार ४०० कोटी रुपयांच्या ठेवी आहेत. यामध्ये प्रवरा ग्रामीण पतसंस्थेचे योगदानही मोलाचे आहे. सहकारी संस्थांनी भविष्यातही पारदर्शक, काटकसरीचा आणि सभासदांच्या हिताचा कारभार करून सहकार चळवळ अधिक मजबूत करावी, या सहकारी संस्थांमुळे तालुक्यात आर्थिक समृद्धी निर्माण झाले असल्याचे असे प्रतिपादन मा. महसूल व कृषी मंत्री लोकनेते बाळासाहेब थोरात यांनी केले.



धांदरफळ खुर्द येथे प्रवरा ग्रामीण पतसंस्थेच्या स्वमालकीच्या नूतन इमारतीचे उद्घाटन थोरात यांच्या हस्ते झाले. आमदार डॉ. सुधीर तांबे यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी युवक काँग्रेसच्या अध्यक्षा जयश्री थोरात, माधवराव कानवडे, पांडुरंग घुले, तालुका काँग्रेस अध्यक्ष अजय फटांगरे, रामहरी कातोरे, रमेश गुंजाळ, विलास कवडे, विजय राहणे, मारुती कवडे, संपतराव डोंगरे, मुरलीआप्पा खताळ, शरद नाना थोरात आणि ह.भ.प. सुदाम महाराज कोकणे आदी मान्यवर उपस्थित होते.

माजी मंत्री बाळासाहेब थोरात पुढे म्हणाले की, १९८९ मध्ये शरद पवार मुख्यमंत्री झाल्यानंतर राज्यात पतसंस्था चळवळीला खऱ्या अर्थाने गती मिळाली. संगमनेर तालुक्यात पतसंस्थांना दूध संस्थांची जोड देण्यात आली. त्यामुळे आर्थिक व्यवहारांसोबतच वसुलीची हमी निर्माण झाली. आज राज्यात सुमारे ३३ हजार पतसंस्था कार्यरत आहेत. संगमनेर तालुक्यातील पतसंस्थांची प्रगती ही येथील सभासद, कार्यकर्ते आणि सहकार क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांच्या मेहनतीचे फलित आहे. प्रवरा ग्रामीण पतसंस्थेचे १० कोटी रुपयांचे भागभांडवल असून, संस्थेने स्वतःची नवी वास्तू उभी करणे ही अभिमानाची बाब आहे.

प्रवरा ग्रामीण पतसंस्थेची नूतन वास्तू ही केवळ इमारत नसून, सभासदांच्या विश्वासातून आणि सहकाराच्या सामूहिक प्रयत्नांतून उभे राहिलेले यशाचे प्रतीक आहे. सहकाराची ही परंपरा अधिक सक्षमपणे पुढे नेण्याची जबाबदारी सर्वांची आहे, असा संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला. यावेळी डॉ. जयश्री थोरात, रामहरी कातोरे संपतराव डोंगरे मुरली आप्पा खताळ यांनीही मनोगत व्यक्त केलड.

प्रास्ताविक दत्ता कोकने यांनी केले. सतीश खताळ यांनी आभार मानले.

बँकेच्या सेफ डिपॉझिट लॉकरचे उदघाटन

शिक्षक बँकेच्या अध्यक्षपदी जेजुरकर; उपाध्यक्षपदी लवांडे

समाचार/नगर-दि.०७



प्राथमिक शिक्षक सहकारी बँकेच्या नूतन पदाधिकाऱ्यांची निवड बिनविरोध पार पडली असून शिक्षक बँकेच्या चेअरमन पदी कोपरगावचे संचालक शशीकांत जेजुरकर यांची तर व्हा. चेअरमन पदी ऐक्य मंडळाचे नेते पाथर्डीचे संचालक कल्याण लवांडे यांच्या बिनविरोध निवडी झाल्या.शिक्षक नेते बापूसाहेब तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली नवीन पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली. यावेळी शिक्षक बँकेच्या सेफ डिपॉझिट लॉकर सुविधेचे उदघाटन जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे यांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी दत्ता पाटील कुलट, विद्याताई आढाव, गोकुळ कळमकर, राजेंद्र सदगिर, संतोष दुसुंगे, बबन दादा गाडेकर, संतोष दुसुंगे, अर्जुनराव शिरसाठ, बाबासाहेब खरात, शरद सुद्रिक, विजय ठाणगे, साहेबराव अनाप, बाळासाहेब कदम, शरद वांढेकर, नवनाथ तोडमल, मनोजकुमार सोनवणे, आबासाहेब दळवी, नारायण पिसे, प्रकाश नांगरे, भास्कर कराळे, शरद वांढेकर, प्रल्हाद भालेकर, राजेंद्र निमसे, रमेश दरेकर,सुनील शिंदे, विलास गवळी, प्रदीप भाकरे, प्रदीप चक्रनारायण, किरण निंबाळकर, बाळासाहेब कापसे, रामप्रसाद आव्हाड, गणेश पिंपळे, सचिन नाबगे, संदीप होले, पांडुरंग देवकर आदी उपस्थित होते. निवडक प्रक्रियेसाठी जिल्हा सहाय्यक निबंधक सुहास कराळे व पालवे उपस्थित होते. चेअरमन पदासाठी शशिकांत जेजुरकर यांना सूचक म्हणून महेश भनभणे तर अनुमोदन अण्णासाहेब आभाळे यांनी दिले. व्हा. चेअरमन कल्याण लवांडे यांना सूचक म्हणून ज्ञानेश्वर शिरसाठ यांनी तर अनुमोदन निर्गुणा बांगर यांनी दिले. यावेळी बोलताना बापूसाहेब तांबे यांनी शिक्षक बँकेच्या सभासद हिताच्या कारभारासाठी गुरुमाऊली सदिच्छा आघाडी कटिबद्ध राहील, असे आश्वासित केले. जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे यांनी बँकेच्या कारभाराचे कौतुक करून नवीन पदाधिकाऱ्यांना शुभेच्छा दिल्या. शाळातील मराठी शाळांसाठी जिल्हा क्रीडा निधीतून मैदान विकासासाठी निधी उपलब्ध करून दिला जाईल असे सांगितले.

जिल्हा केंद्र प्रमुख संघटनेच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल नानासाहेब गाढवे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी शिक्षक बँकेचे संचालक डॉ. संदीप मोटे, कैलास सारोक्ते, अण्णासाहेब आभाळे, सरस्वती घुले, बाळासाहेब तापकीर,राजेंद्र कुदनर, माणिक कदम, योगेश वाघमारे, गोरक्षनाथ विटनोर, रामेश्वर चोपडे, निर्गुणा बांगर, विजय नरवडे, कारभारी बाबर, ज्ञानेश्वर शिरसाठ, शिवाजीराव कराड, आदी उपस्थित होते.

१५० गरजू एकल महिलांना किराणा किटचे वाटप

समाचार/नगर-दि.७

दिवाळी म्हणजे आनंद, प्रकाश, मांगल्य आणि आपुलकीचा सण! मात्र समाजातील प्रत्येकाच्या आयुष्यात हा आनंद सारख्याच प्रमाणात पोहोचतो असे नाही. अनेक गरजू, वंचित आणि संघर्षशील महिलांच्या आयुष्यात आर्थिक परिस्थितीमुळे सणाचा आनंद मर्यादित राहतो. अशाच महिलांच्या आयुष्यात आनंदाचा दीप प्रज्वलित करण्याचा संवेदनशील आणि स्तुत्य उपक्रम अहिल्यानगर डाक विभागाच्या वतीने राबविण्यात आला.

स्नेहालय संचलित 'उमेद प्रकल्प' आणि 'साऊ एकल महिला समिती' यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित दिवाळी भाऊबीज स्नेहमेळाव्याचे औचित्य साधून डाक विभागाच्या वतीने समाजातील गरजू वंचित एकल महिलांना तब्बल १५० किराणा किटचे सन्मानपूर्वक वाटप करण्यात आले. प्रवर



अधीक्षक डाकघर अहिल्यानगर विकास पालवे यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या या अभिनव सामाजिक उपक्रमाने दिवाळीच्या आनंदाला माणुसकीची आणि सामाजिक बांधिलकीची सुंदर किनार लाभली.

रेहमत सुलताना हॉल, सर्जेपुरा, अहिल्यानगर येथे पार पडलेला हा स्नेहमेळावा केवळ एक कार्यक्रम नव्हता, तर संघर्षमय जीवन जगणाऱ्या महिलांना आधार, आपुलकी आणि सन्मान देणारा माणुसकीचा हृदयस्पर्शी सोहळा ठरला.

या कार्यक्रमास अहिल्यानगरचे प्रवर अधीक्षक डाकघर विकासजी पालवे, स्नेहालयचे गिरीशजी कुलकर्णी, साऊ एकल महिला समितीचे निमंत्रक हेरंब कुलकर्णी, एकता परिषदेचे संस्थापक सदस्य व ज्येष्ठ गांधीवादी विचारवंत डॉ. पी. व्ही. राजगोपाल तसेच कॅनडाच्या शिक्षणतज्ज्ञ आणि सामाजिक न्यायाच्या पुरस्कर्त्या डॉ. जिल कॅर हॅरिस यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रवर अधीक्षक विकास पालवे म्हणाले की, आजचा हा कार्यक्रम म्हणजे केवळ किराणा किट वाटपाचा उपक्रम नसून माणुसकीचा उत्सव आणि सामाजिक संवेदनशीलतेचा जागर आहे. समाजातील गरजू घटकांच्या दुःखात सहभागी होऊन त्यांच्या आयुष्यात आशेचा किरण निर्माण करण्याचा डाक विभागाचा हा एक प्रामाणिक प्रयत्न आहे.

दिग्गज नेत्यांकडून प्रकृतीची विचारपूस

शरद पवारांना रुग्णालयातून डिस्चार्ज

समाचार/मुंबई-दि.७

माजी केंद्रीय कृषीमंत्री आणि शरद पवार राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा खा. शरद पवार यांच्या प्रकृतीत सुधारणा झाल्याने त्यांना आज ब्रिच कँडी रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला. त्यानंतर खा. पवार आपल्या सिल्व्हर ओक या निवासस्थानी पोहोचले. खा. पवार यांच्यावर पुढील उपचार घरीच करण्यात येणार आहेत. दरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह दिग्गज नेत्यांनी खा. पवार यांच्या प्रकृतीची विचारपूस केली.

दुष्काळी भागाच्या दौऱ्यावर असताना त्रास जाणवू लागल्याने खा. पवार यांना आधी पुण्यातील रूबी रुग्णालयात व त्यानंतर मुंबईच्या ब्रीच कँडी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. तेथे त्यांच्यावर डॉक्टरांच्या विशेष पथकाने उपचार केले. प्रकृतीत सुधारणा झाल्याने खा. पवार यांना आज रुग्णालयातील घरी जाऊ देण्यात आले. रुग्णालयात असताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी फोन करत खा. पवार यांच्या प्रकृतीची विचारपूस केली. मुंबईत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, खा. प्रफुल्ल पटेल, मंत्री छगन भुजबळ, दिलीप वळसे पाटील, उपसभापती सचिन अहिर, उद्योगपती गौतम अदानी, माजी मंत्री बाळासाहेब थोरात, विश्वजित कदम, खा. संजय राऊत आदी नेत्यांनी रुग्णालयात जात खा. पवार यांच्या प्रकृतीची विचारपूस केली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही खा. सुप्रिया सुळे यांच्याशी संवाद साधत खा. पवार यांच्या प्रकृतीची माहिती घेतली.

राष्ट्रपतींबाबत आक्षेपार्ह व अवमानकारक पोस्ट

जनजाती कल्याण आश्रमाची दोषींवर कारवाईची मागणी

समाचार/नगर-दि.७

नाशिक येथे सिंहस्थ कुंभमेळ्याच्या ध्वजस्तंभ पूजन व धर्मध्वजारोहण कार्यक्रमास भारताच्या महामहिम राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू उपस्थित होत्या. त्यांच्या हस्ते विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रम झाले. यानंतर विकास लवांडे या व्यक्तीने समाजमाध्यमांवर राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या बाबत आक्षेपार्ह, दिशाभूल करणारे व आदिवासी समाजाच्या अस्मितेला ठेच पोहोचवणाऱ्या अपमानकारक संदेश प्रसारित केला. याची सखोल चौकशी करून संबंधित व्यक्तीविरुद्ध कडक कायदेशीर कारवाई करून अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) अधिनियम, १९८९ नुसार कारवाई करण्याची मागणी अहिल्यानगर जनजाती कल्याण आश्रमच्या वतीने जिल्हा पोलीस अधीक्षक सुदर्शन मुम्मका यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

यावेळी जनजाती कल्याण आश्रमाचे दक्षिण अहिल्या नगर संघटनमंत्री हरिजीत माळी, जिल्हा सचिव अनंत पुंड, डॉ.निळकंठ ठाकरे, नानासाहेब गुरसळ, विशारद पेटकर, हिंतरक्षाप्रमुख संदिप गायकवाड, श्रीरामपुर तालुका प्रमुख रमेश सोनवणे, पाथर्डी तालुका प्रमुख अर्जुन माळी, संगमनेर तालुका गटप्रमुख राकेश माळी, राहुरी तालुका गटप्रमुख दीपक वाघ, आदी पदाधिकारी उपस्थित होते.

शुभ दीपावली

जोखीम म्हणजे नक्की काय?

हे फक्त बाजाराच्या घसरणीत तपासू नका!

गुंतवणूक करण्याअगोदर योग्य पर्याय व जोखीम समजावून घ्या!

- Mutual Fund
- PMS
- SIF
- म्युच्युअल फंड
- पीएमएस
- एसआयएफ

Creative 9822218425

Deshpande Investments
The Mutual Fund House

18, Sonanagar, Savedi, Ahilyanagar
deshpandeinvestment@gmail.com
www.deshpandeinvestments.com

Rajesh Deshpande
M.A. (Economics), MBA (Finance)
Exce. FRM-IIM (Vizag)
ARN 77369, NISM Certified
AMFI Reg. MFD/PMS
9850724890

"Mutual fund investments are subject to market risks, read all scheme related documents carefully before investing."